# संपादकीय

## बोलोग्ना येथील जागतिक बालसाहित्य जत्रा

दि. २१-२२ डिसेंबर २००२ रोजी अ. भा. बालकुमार साहित्य संमेलनाचे १६ वे अधिवेशन सातारा येथे नगर परिषदेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव समितीतर्फे होणार आहे. बालसाहित्यविषयक विविध कार्यक्रम व ग्रंथप्रदर्शन प्रतापसिंह हायस्कूलच्या परिसरात होणार आहेत. या अधिवेशनांतून बालसाहित्य चळवळीला चालना मिळते.

यानिमित्ताने अशाच एका उपक्रमाचे स्मरण होते. इटलीतील बोलोग्ना येथे दरवर्षी एप्रिलमध्ये भरणारी बालसाहित्य जत्रा ही जगात सर्वात मोठी मानली जाते. यावेळी ती २ ते ५ एप्रिल २००३ च्या दरम्यान भरणार आहे. तेथले वातावरण एखाद्या परीनगरीसारखे झगमगीत असते. गेल्या वर्षी तिच्यात ५५ देशातील १३७६ प्रकाशन संस्थांचा सहभाग होता आणि ७० देशातील बालसाहित्याशी संबंधित ४३५६ व्यावसायिकांनी तिला भेट दिलेली होती. ६५० पत्रकारांची उपस्थिती आणि दूरचित्रवाणी, आकाशवाणी, वृत्तपत्रे, नियतकालिकांमधून मिळालेली प्रसिद्धी यामुळेही ती जगाचे लक्ष वेधून घेणारी बालसाहित्य जत्रा ठरते. या ग्रंथजत्रेत प्रत्यक्ष पुस्तकांची विक्री होत नाही, सर्वसामान्य वाचकांनाही कुतूहल म्हणून हजेरी लावता येत नाही. ती निखळ व्यावसायिकांसाठी असते; आणि जगभरातील उत्तमोत्तम बालसाहित्याचा समावेश या जत्रेत असतो. नव्या पुस्तकांची माहिती घेणे, त्या पुस्तकांचे भाषांतराचे, चित्रीकरणाचे व इतर हक्क विकत घेणे, ई-बुक्स, सीडी रॉम वगैरेंचे हक्क घेणे या दृष्टीने प्रकाशकांची व्यावहारिक देवघेव करण्याचे बोलोग्ना हे आज प्रमुख केंद्र ठरले आहे.

बोलोग्ना बालसाहित्य जत्रेचा आरंभ १९६४ साली झाला.

दि फिएरा डेल लिब्रो पेर रागाझ्झी असे तिला इटालियनमध्ये म्हणतात. जर्मनीतील फ्रँकफुर्ट येथील आंतरराष्ट्रीय ग्रंथजत्रा ही जगभर नावाजली जाते. या ग्रंथजत्रेत बालसाहित्याला नाममात्रच स्थान मिळत असे. हे पाहून इटालीतील काही बालसाहित्याच्या प्रकाशकांना आपली होणारी उपेक्षा खटकली. त्यांनी केवळ बालसाहित्याची जत्रा भरवण्याचे ठरवले. बालवाङ्मय हे एकूण ग्रंथव्यवहारातले पायाभूत दालन आहे. बालसाहित्य हे खऱ्या अर्थाने विश्वसाहित्य आहे आणि भावी पिढ्यांच्या सुयोग्य जडणघडणीसाठी त्याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे, अशी त्यांची भावना होती. त्यासाठी देशोदेशींच्या बालवाङ्मयाच्या प्रकाशकांना एकत्र आणणे, त्यांच्या बालसाहित्याचे प्रदर्शन भरविणे आणि उत्तमोत्तम पुस्तके भाषांतराद्वारे वेगवेगळ्या भाषांमध्ये उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रकाशन संस्थांमध्ये करारमदार घडवून आणण्यास प्रोत्साहन देणे, उत्कृष्ट बालसाहित्याला पुरस्कार देऊन गुणवत्ता वाढवण्यास उत्तेजन देणे, नवनवीन कल्पनांसाठी स्वागतशील वातावरण तयार करणे, चित्रकारांना आपल्या प्रतिभेचे वेगवेगळे पैलू दाखवण्यास अवसर देणे, प्रकाशक - लेखक चित्रकार - मुद्रक यांच्यातील परस्परसंवाद व सहकार्य वाढविणे, बालसाहित्याबद्दल जनमानसात आदराची भावना निर्माण करणे या दृष्टीने इटालीमधील बालवाङ्मयाच्या प्रकाशक संघटनेने पुढाकार घेऊन १९६४ मध्ये बोलोग्ना येथे पहिली बालसाहित्य जत्रा भरवली. तिच्यात ४४ प्रकाशकांनी भाग घेतला. युरोप-अमेरिकेतील अनेक भाषांमधील बालसाहित्याच्या अनुवादाचे करार होऊन, एकूणच आंतरराष्ट्रीय देवघेवीला चालना मिळाली. त्यामुळे दरवर्षी सहभागी होणाऱ्या



प्रकाशकांची संख्या वाढत गेली. या ग्रंथजत्रेमुळे प्रकाशक - लेखक - एजंटस - अनुवादक यांच्यातील संबंध घनिष्ठ होत गेले. नवनव्या कल्पना पुढे येत राहिल्या. रंगीत पुस्तकांची चित्रमय छपाई समाईक करून फक्त मजकूर वेगवेगळ्या भाषेत छापायचा या दिशेने प्रयोग सुरू झाले. ते खर्चात बचत करणारे ठरले. तसेच दर्जेदार पुस्तके अनेक भाषांत अल्प दरात मिळण्याची सोय झाली.

१९७६ पासून या जत्रेचे आयोजक तिसऱ्या जगातील देशांकडे विशेष लक्ष पुरवू लागले. त्या त्या देशाच्या सांस्कृतिक व्यवहार खात्याला या जत्रेत सहभागी होण्यासाठी निमंत्रणे पाठवण्यात येऊ लागली. त्यामुळे संबंधित खात्यातर्फे अधिकारी आणि त्या देशातील अग्रगण्य प्रकाशन संस्था यांची बोलोग्ना जत्रेतील उपस्थिती सुलभ झाली. सहभागी होणाऱ्या प्रकाशनसंस्थांची संख्या ४०० वर गेली. १९८५ मध्ये ती हजारावर गेली. १९८८ मध्ये ५० देशातील १००० प्रकाशकांनी व प्रतिनिधींनी या जत्रेत भाग घेऊन आपापली पुस्तके प्रदर्शित केली.

वर म्हटल्याप्रमाणे या जत्रेत पुस्तकांची प्रत्यक्ष विक्री होत नाही. लेखक, प्रकाशक, शिक्षणतज्ज्ञ, संशोधक, प्रकाशकांचे एजंट, पुस्तकांचे संपादक, चित्रकार, विक्रेते वगैरे येथे येतात. पुस्तके बघतात. भाषांतराचे हक्क घेण्यासाठी वाटाघाटी करतात. लेखक व प्रकाशक हे नव्या पुस्तकांबाबत करारमदार करतात. चित्रकारही त्यात आपले योगदान देतात. परस्पर सहकार्याने पुस्तकनिर्मिती करण्याबद्दलही भिन्नभिन्न भाषिक प्रकाशकांमध्ये विचारविनिमय होतो. एकूण व्यवहाराला आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त होते.

चित्रकारांना बालसाहित्याच्या सजावटीत आणि निर्मितीत लेखकाइतकेच महत्त्व असते. बालसाहित्यातील निवडक चित्रांचे, ओरिजिनल चित्रांचे प्रदर्शनही या जत्रेत भरवण्यात येते. या चित्रांची निवड मोठ्या कसोशीने केली जाते. अंतिम फेरीत सुमारे २००० चित्रांमधून दोनशे कलाकृतींची प्रदर्शनासाठी निवड होते. त्यात कथाकादंबऱ्यांप्रमाणेच माहितीपर (नॉन फिक्शन) विषयांवरील पुस्तकांमधील चित्रेही असतात. उत्तम चित्रांना पुरस्कार देण्यात येतात.

जत्रेत प्रदर्शित होणाऱ्या पुस्तकांपैकी उत्कृष्ट पुस्तकांनाही पुरस्कार देण्यात येतात. अशा पुस्तकांचे प्रदर्शन स्वतंत्र दालनात मांडण्यात येते. वाचकांच्या मते उत्कृष्ट ठरणाऱ्या पुस्तकांनाही खास बक्षीसे देण्यात येतात.

बालवाङ्मय म्हणजे केवळ कथाकादंबऱ्या, कविता, नाटक, चरित्र, एवढेच नव्हे, त्यात शैक्षणिक व माहितीपर पुस्तकांचाही समावेश होतो. त्यामुळे या जत्रेच्या निमित्ताने होणाऱ्या परिसंवादांना विविध क्षेत्रातील व्यक्तींना पाचारण करण्यात येते. लेखक, कवी, प्रकाशक, विक्रेते, शिक्षक, संशोधक, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, वैज्ञानिक, भाषाशास्त्रज्ञ, कलावंत व चित्रकार वगैरे या चर्चासत्रात विचारांची व कल्पनांची देवाण घेवाण करतात.

१९८९ पासून भारतही बोलोग्ना बालसाहित्य जत्रेत सहभागी होत आला आहे. भारत सरकारतर्फे भिन्नभिन्न भाषांतील हजारावर पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात येतात. भारतात आता बरेच प्रकाशक बालसाहित्य क्षेत्रात भरीव कामगिरी करीत आहेत. ॲसोसिएशन ऑफ रायटर्स ॲंड इलस्ट्रेटर्स फॉर चिल्ड्रेन या संस्थेतर्फे या जत्रेतील प्रदर्शनाची व्यवस्था पाहण्यात येते. इंडियन कौंसिल फॉर कल्चरल रिलेशन्सतर्फे आर्थिक मदत आरंभी मिळत राहिल्याने आपला सहभाग अर्थपूर्ण होत राहिला. अनेक भारतीय प्रकाशक या जत्रेतील नवनव्या पुस्तकांमुळे प्रभावित झाले आणि आपल्या भाषांत या पुस्तकांचे अनुवादाचे हक्क मिळवण्यासाठी प्रयत्न करू लागले. आपल्या बालसाहित्याचे हक्क घेण्यात श्रीलंका, आफ्रिकन व आशियाई देशांनी विशेष स्वारस्य दाखवले. भारताची पुस्तकांची निर्यात वाढण्यासही या जत्रेचा उपयोग झाला आहे. १९९२ मध्ये ४२ भारतीय चित्रकारांची चित्रे या जत्रेत मांडण्यात आली.

बोलोग्ना हे बालसाहित्यक्षेत्रात काम करणाऱ्या सर्व व्यक्तींचे आता एक संपर्क केंद्र बनले आहे. दरवर्षी अनेक लेखक कवी, चित्रकार, संपादक, प्रकाशक, एजंट तेथे येतात. नवीन पुस्तके बघतात. त्यांचे हक्क मिळवतात. चर्चा करतात. विक्री, वितरण निर्मिती याबाबत सहकार्याचे नवनवे मार्ग शोधून काढतात. देशादेशातील बालकांच्या गरजांचे भान ठेवून, त्यांच्या पूर्ततेच्या दिशेने परस्परांना मदत देतात. या जत्रेचे महत्त्व देशोदेशींच्या वृत्तपत्र व संपर्क माध्यमांनाही आता जाणवू लागले आहे. गेल्या वर्षी ६५० पत्रकार या जत्रेला उपस्थित होते. दूरचित्रवाणी, रेडिओ यांनी वृत्तपत्रांप्रमाणेच भरपूर प्रसिद्धी या जत्रेला दिली. 'फास्ट ट्रॅक' या केंद्राद्वारे निरनिराळ्या भाषांतील अनुवादाचे करारमदार करण्याबाबत मार्गदर्शन केले जाते. दि राइटस सेंटर फॉर टीव्ही/फिल्म प्रोफेशनल्स या दालनात बालसाहित्याचे प्रकाशक व चित्रपट दिग्दर्शक यांच्यात करारमदाराच्या दृष्टीने मार्गदर्शन व मदत मिळू शकते. इ. स. २००३ मध्ये पोलंडमधील अग्रगण्य चित्रकारांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरणार आहे. दि ग्लोबल लर्निंग इनिशिएटिव्ह या योजनेखाली शालेय पुस्तकांचे हक्क वेगवेगळ्या भाषांतील प्रकाशकांना घेणे सुलभ केले जाते. आता मुद्रित पुस्तकाबरोबर सीडी रॉम, ई बुक्स, ध्वनिफिती, चित्रफिती, मल्टिमिडिया, गेम्स यांचीही येथे रेलचेल असते. चित्रपट, दूरचित्रवाणीवरील बालकार्यक्रम याबाबतही येथे देवघेवीचे व्यवहार होतात. केवळ मुद्रित पुस्तक एवढाच मर्यादित अर्थ आता बालसाहित्याचा उरलेला नाही.

निरनिराळ्या प्रकाशकांचे एजन्ट आणि संपादक यांच्या गाठीभेटी लेखकांना घेणे सोयीचे व्हावे म्हणून एक खास दालन या जत्रेत असते. तेथे फोन, संगणक, प्रेझेंटेशन वगैरे सर्व सोयी असतात. वाटाघाटींसाठी स्वतंत्र केबिन्स असतात. सेक्रेटरी व टायपिस्टही मिळू शकतात. खानपानाची देखील उत्तम व्यवस्था असते. 'डस्ट ऑर मॅजिक इंटरनॅशनल फ्रॉम पेपर टू पिक्सल्स' हा दोन दिवसांचा अभ्यासवर्ग होतकरू प्रकाशकांसाठी या जत्रेच्या आधी घेण्यात येतो.

बोलोग्ना येथील बालसाहित्य जत्रेतील वातावरण हे व्यावसायिक असते आणि निरनिराळ्या देशांतील ताजे बालसाहित्य तेथे बघायला मिळते. हॅरी पॉटरच्या जागतिक लोकप्रियतेला व विक्रमी खपाला या जत्रेनेही चांगला हातभार लावला. फॅंटसीची पुस्तके नव्या दिमाखाने मिरवू लागली. बाल कथाकादंबऱ्यांना आजही मोठी मागणी आहे हे या जत्रेतील गेल्या वर्षातील एकूण करारांवरून लक्षात येते, असे पब्लिशर्स वीकलीला आढळून आले. एकूण बालसाहित्याविषयी जगभर आज उत्साहवर्धक वातावरण आहे, असे या जत्रेवरून लक्षात येते.

या जत्रेत भाग घेणे हा अर्थातच खर्चिक प्रकार आहे. ४ x ४ मीटरसच्या स्टॉलसाठी २२६० युरोडॉलर्स भाडे आहे. रजिस्ट्रेशन शुल्क ३५० युरोडॉलर्स आहे. २२ हजार चौ. मीटर क्षेत्रफळात दहा दालनांत ग्रंथजत्रा विभागलेली असते. व्यवसायाच्या नव्या संधी येथे गवसतात. नवीन पुस्तके बघायला मिळतात. नव्या ओळखी होतात. करारमदार करता येतात. बालसाहित्याचा दर्जा उंचावण्यासाठी आणि बालसाहित्याचे जागतिक आदानप्रदान मोठ्या प्रमाणावर होण्यासाठी बोलोग्ना ग्रंथजत्रेने गेल्या ४० वर्षात महत्त्वपूर्ण योगदान केलेले आहे यात शंकाच नाही.

बालसाहित्य संमेलने आपल्याकडे भरतात. त्यामध्ये लेखक-प्रकाशक यांना स्वतंत्रपणे भेटीगाठी घेऊन आपल्या नव्या पुस्तकांच्या योजना आखणे, करारमदार करणे सुलभ जावे यासाठी व्यवस्था करता आली तर ती स्वागतार्ह गोष्ट ठरेल.

**संपादक**






## डॉ. सुभाष भेंडे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड

''साहित्य संमेलने स्वावलंबी करण्यासाठी महाकोश उभारण्याच्या कार्याला गती आणू आणि त्यामध्ये येत्या वर्षभरात मोठी भर घालू,'' असा विश्वास कऱ्हाड येथे होणाऱ्या ७६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सुभाष भेंडे यांनी पुणे येथे व्यक्त केला.महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यता आला.

डॉ. भेंडे म्हणाले, ''कला, साहित्य, संस्कृती यांसाठी मदत करणे हे कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेनुसार राज्य सरकारचे कर्तव्यच असते. त्यामुळे साहित्य संमेलनास सरकारने मदत करणे अपेक्षितच आहे. या मदतीसाठी याचकत्व पत्करण्याची गरज नाही. मात्र, सरकारकडून उपकाराची भाषा झाल्यानंतर संमेलनासाठी महाकोश उभारण्याची संकल्पना पुढे आली. या कोशात फारशी रक्कम जमलेली नाही. मराठीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाकडून या कोशासाठी अधिक रक्कम जमविता येईल. हे काम अवघड नाही. त्यामुळे या निधीत मोठी भरू घालू शकेन असे वाटते.''

साहित्याची लहानपणापासून आवड होती; अर्थशास्त्र विषय घेऊन कारकीर्द घडवीत असताना लेखनही करता आले, असे नमूद करून डॉ. भेंडे म्हणाले, ''अर्थशास्त्र हा विषय घेण्याचा माझ्या गुरूंनी दिलेला सल्ला अमलात आणल्याचा आणि त्याचबरोबर पीएच. डी. नंतर उद्योगक्षेत्रात न जाता प्राध्यापकी पेशातच राहण्याच्या निर्णयाचा मला कधीच पश्चात्ताप झाला नाही. या दोन्ही निर्णयांमुळे मला माझे लेखन करता आले.''

''माझ्यावर प्रेम करणाऱ्या रसिकांमुळे मी अध्यक्षपदाच्या सर्वोच्च सन्मानापर्यंत येऊन पोचलो. माझ्याहून ज्येष्ठ असलेले काही साहित्यिक वेगवेगळ्या कारणांमुळे अध्यक्ष होऊ शकले नाहीत, याची जाणीवही मला आहे. ''अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या बाबतीत कमीत कमी दोष असलेली पद्धत अमलात आणायला हवी.''

प्रा. बाळ गाडगीळ, न. म. जोशी, वि. बा. प्रभुदेसाई, उपेंद्र कुलकर्णी आदींनी डॉ. भेंडे यांच्या साहित्याचे कौतुक केले. डॉ. बनहट्टी म्हणाले, ''डॉ. भेंडे हे अष्टपैलू लेखक आहेत. कविता वगळता सर्व लेखन प्रकारांत त्यांनी आपला ठसा उमटविला आहे. चतुरस्त्र लेखणीचे वरदान त्यांना लाभले आहे.''

## 'भाषा जाणून घेण्यासाठी संस्कृतीचा अभ्यास गरजेचा'

कोणतीही भाषा जाणून घेण्यासाठी संस्कृतीचा अभ्यास करण्याची गरज आहे असे मत 'इन्फोसिस फाऊंडेशन'च्या अध्यक्षा व प्रसिद्ध लेखिका डॉ. सुधा नारायण मूती यांनी पुणे येथे व्यक्त केले.

मराठी कन्नड स्नेहवर्धन केंद्रातर्फे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. शिवराम कारंत व ज्येष्ठ उद्योगपती

शंतनुराव किर्लोस्कर जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात सुधा मूर्ती यांचा सत्कार योगाचार्य डॉ. बी. के. एस. अय्यंगार यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी 'स्नेहवर्धन सेतू' व 'शिक्षणादल्ली प्रतिज्ञे' या पुस्तकांचे प्रकाशन त्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच विरुपाक्ष कुलकणी यांनी अनुवादित केलेल्या 'होस होळहू' या ग्रंथाचेही प्रकाशन झाले. मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष व सेंटर फॉर इंडस्ट्रीजचे अध्यक्ष डॉ. भा. र. साबडे, प्रसिद्ध लेखिका डॉ. उमा कुलकणी, केंद्राचे मानद चिटणीस कृ. शि. हेगडे आदी या वेळी उपस्थित होते. डॉ. अ. रा. तोरो कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

कोणतीही भाषा जाणून घेण्यासाठी संस्कृतीचा अभ्यास करण्याची गरज आहे. मराठी-कन्नड भाषेचा विषय निघताच सीमाप्रश्नाविषयी चर्चा केली जाते. मराठी व कन्नड या दोन्ही भाषांमध्ये जवळचे नाते आहे. भाषा शिकवण्यासाठी मराठी संस्कृती जाणून घेतली. पुणे शहराने मला आत्मविश्वास दिला. लेखन हा माझा आवडता छंद आहे. कानडी भाषेत मी भावनात्मक लिखाण केले आहे, तर इंग्रजी भाषेत वैचारिक लिखाण केले आहे. आतापर्यंत सात कादंबऱ्या, चार तांत्रिक विषयांवरील पुस्तके व तीन प्रवासवर्णने आदी लिखाण केले आहे, असे त्यांनी नमूद केले.

डॉ. अय्यंगार यांनी सांगितले की, प्रकृती उत्तम राहिली तर विचारही चांगले राहतात. शारीरिक व्याधींवर मात करण्यासाठी योगसाधना करण्याची गरज आहे.

## 'प्रादेशिक विद्यापीठांनी संस्कृतीला प्राधान्य द्यावे'

''प्रादेशिक विद्यापीठांनी प्रादेशिक भाषा व संस्कृतीला प्राधान्य द्यायला हवे. मराठी भाषा ही ज्ञानभाषा व्हावी, यासाठी चालना देता येईल,'' असे डॉ. जनार्दन वाघमारे यांनी सांगितले.

''साहित्याची संपन्नता वाढावी व त्याच वेळी भाषेचाही विकास व्हावा, यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. शासन, विद्यापीठे व मराठी साहित्य महामंडळ यांच्या समन्वयातून हा प्रश्न सोडवता येईल. अनुवादाचे प्रकल्प हाती घ्यायला हवेत, आणि विद्यापीठांमध्ये तौलनिक साहित्याभ्यासावर भर दिला पाहिजे. साहित्य संमेलन व साहित्य महामंडळ सर्व मराठी भाषकांचे प्रतिनिधित्व करू शकेल, असा विचार झाला पाहिजे.''

## नाशकात आढळली उर्दूतील भगवद्‌गीता

उर्दू भाषेत आणि लिपीत सुमारे शंभर वर्षांपूर्वी छापले गेलेले एक पुस्तक नाशिकचे रहिवासी निवृत्त प्राध्यापक हरी अनंत फडके यांच्याकडे होते... त्याचे वेगळेपण म्हणजे, या उर्दू पुस्तकात चित्र होते बासरी वाजवणाऱ्या श्रीकृष्णाचे !

हे पुस्तक म्हणजे भगवद्‌गीतेचा उर्दू भावानुवाद असल्याचे आता निष्पन्न झाले आहे. उर्दू लिपीची जाणकारी नसल्यामुळे त्या जुन्या पुस्तकाविषयी काही सांगता येणे कठीण होते. पण पानिपत येथे भरलेल्या एका चर्चासत्रात प्रा. फडके हे पुस्तक घेऊन गेले आणि तेथे अलीगढ़ मुस्लिम युनिव्हर्सिटीचे निवृत्त प्राध्यापक डॉ. सिद्दीकी व जामिया मिलिया इस्लामिया विद्यापीठाचे प्राध्यापक ग्रोव्हर यांनी या पुस्तकाची ओळख पटवली !

भगवद्‌गीतेच्या या भावानुवादाबद्दल बोलताना, 'हिंदू जीवनपद्धतीचा पाया घालणाऱ्या या ग्रंथाचा उर्दू भाषेत भावानुवाद होणे ही धर्माचा केवळ माणुसकीशी संबंध असल्याचे स्पष्ट करणारी



गोष्ट आहे,' असे प्रा. फडके यांनी सांगितले. प्रा. फडके कुरुक्षेत्र विद्यापीठातून निवृत्त झाले आहेत. तेथेही त्यांच्याकडे हे उर्दू पुस्तक होते. गीतेच्या अनेक भाषांतील आवृत्त्यांवर जे, पार्थसारथी कृष्णाचे कुरुक्षेत्रावरील चित्र असते, ते या पुस्तकावर नाही. शिवाय, छपाई लिथोग्राफ पद्धतीने (शिळाप्रेस) झाली आहे. मात्र, धार्मिक तत्त्वज्ञानाचा सेतू बांधणारे हे पुस्तक लिहिले कोणी, याचा शोध लागू शकलेला नाही. मुखपृष्ठावरही पुस्तककर्त्यांचे नाम नाही.

बायबलच्या आवृत्त्यांमागे धर्मप्रसाराचा हेतू होता. या पार्श्वभूमीवर, माणुसकीच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून देणाऱ्या गीतेच्या या उर्दू भावानुभावाचे महत्त्व आगळे आहे, असे प्रा. फडके यांना वाटते. 'इस गीता को जो पढ़ेगा उसे एक हजार अश्वमेध यज्ञ करनेका पुण्य प्राप्त होगा । ये किताब राहत बख़्शती है, जो इसे पढ़ेगा, सुनेगा उसे सुख प्राप्त होगा, आबादी आबाद होगा ।' असे सारविज्ञापन (ब्लर्ब) या पुस्तकावर आहे...

## ग्रामस्वराज्याच्या दिशेने शासनाचे पाऊल

''ग्रामसभेकडे गावविकासाचे अधिकार सोपवून महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेच्या दिशेने राज्य शासनाने एक पाऊल टाकले आहे,'' असे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी सांगितले. महाराष्ट्र गांधी स्मारक निधी व गांधी दर्शन अकादमी यांच्या वतीने ज्येष्ठ विचारवंत बाळासाहेब भारदे यांच्या 'गांधी विचार मीमांसा' या पुस्तकाचे प्रकाशन झाले. उद्योगमंत्री पतंगराव कदम अध्यक्षस्थानी होते.

महात्मा गांधीजींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न आम्ही प्रत्यक्षात आणू इच्छित आहोत, असे सांगून देशमुख म्हणाले, '' गावातील लोकांना गावाच्या विकासाच्या निर्णयप्रक्रियेत सामावून घेतले पाहिजे. लोक निर्णयप्रक्रियेत सामील झाले, तर विकासाचे सर्व प्रश्न सुटतील.''

श्री. भारदे म्हणाले, ''एकीकडे ज्ञानविज्ञान वाढत असताना दुसरीकडे मानवता नष्ट होत चालली आहे. अशा वेळी भावनेने काम न करता, निर्भय वृत्तीने काम करायला हवे. ग्रामीण जनतेचा विकास हा पाया धरून नियोजन केले पाहिजे.''

## तुलसीरामायणाच्या मराठीतील अनुवादाचे पुण्यात प्रकाशन

अनेक रामकथांत रामाने सीतेचा त्याग केला असला तरी तुलसीदासांना रामसीतेचा वियोग मान्य नाही. सीतेसह प्रभू जेथे आहेत ते विश्व सत्य आहे, अन्यथा नाही. शैव व वैष्णवांचे ऐक्य दाखवणारे सार्थ तुलसीरामायण आजही भक्तिभवाने वाचले जाते, असे प्रतिपादन रामायणाचे अभ्यासक डॉ. स. म. परळीकर यांनी केले. यशवंत प्रकाशनातर्फे सार्थ तुलसीरामायण या मराठीतील अनुवादित ग्रंथाचे प्रकाशन झाले. या ग्रंथाची मूळ भाषा अत्यंत मधुर व रसाळ असून रसिक वाचकांसाठी हे पुस्तक मराठीत आणले असे मालती भाले यांनी सांगितले. गांधीवादी विचारवंत बाळासाहेब भारदे यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

## बहि:स्थ विद्यार्थ्यांचे विद्यापीठात वाचन आंदोलन

जयकर ग्रंथालयातील वाचन कक्षात बसण्यास परवानगी मिळावी, यासाठी बहि:स्थ विद्यार्थ्यांनी कुलगुरूंच्या निवासासमोर वाचन आंदोलन केले.

पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयात वाचन कक्षाचा लाभ बहि:स्थ विद्यार्थ्यांना मिळत नाही.

या विद्यार्थ्यांनी कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांना निवेदन दिले होते. त्यामुळे विद्यापीठाच्या आवारातील कुलगुरू निवासासमोर राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे शहर अध्यक्ष प्रदीप देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हे विद्यार्थी वाचन करीत बसले होते.

## शिवाजी सावंत प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी डी. वाय. पाटील

'मृत्युंजय'कार शिवाजी सावंत स्मारक प्रतिष्ठानच्या अध्यक्षपदी डॉ. डी. वाय. पाटील यांची, तर कार्याध्यक्षपदी डॉ. बुधाजीराव मुळीक यांची निवड करण्यात आली आहे. प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार रामभाऊ जोशी, डॉ. आनंद यादव, जयसिंगराव देसाई, उल्हास पवार व अंकुश काकडे आहेत. कोषाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी, तर प्रमुख कार्यवाह जयराम देसाई आहेत. सहकार्यवाह म्हणून अमिताभ शिवाजी सावंत व दीपक करंदीकर काम पाहणार आहेत.

प्रतिष्ठानच्या कार्याच्या दृष्टीने स्वतंत्र कार्यकारिणी निर्माण करण्यात आली आहे. त्यामध्ये श्रीमती प्रतिभा शाहू मोडक, आनंद माडगूळकर, प्रा. चंद्रकुमार नलगे, अशोक गगराणी, कर्नल रविकांत जाधव, मिलिंद एकबोटे, चित्रकार ल. म. कडू, कुमार खोंद्रे, धनंजय सोलंकर, पी. डी. पाटील, योगेश देसाई यांचा समावेश आहे.

## बंधुत्वात, भ्रातृभावात अपार सामर्थ्य

पुणे जिल्ह्यातील टाळगाव चिखली येथील पूजा मंगल कार्यालयात १२ व १३ ऑक्टोबरला चौथे 'राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलन' संपन्न झाले. त्या संमेलनाचे अध्यक्ष डॉ. यू. म. पठाण अध्यक्षीय भाषणात म्हणाले, ''वाङ्मयमूल्य व जीवनमूल्य यांच्यामधील जवळिकीचा, त्यांच्यातील सख्याचा व बंधुत्वाचा विचार करून, त्यांच्या विविध पैलूंचे रूप न्याहाळावे व ते आपल्या लेखनातून मांडावे, असे मला वाटले आहे. आजच्या जीवनातल्या सामाजिक व राष्ट्रीय समस्या काळाबरोबर बदलल्या, त्यांचा संदर्भही साहित्याने व साहित्यिकांनी समजून घेणे किती आवश्यक आहे, याचे भान हवे. संपूर्ण समाजाचे व राष्ट्राचे नि पर्यायाने अखिल मानवमात्रांचे कल्याण, हे 'राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलना'चे मूळ अधिष्ठान असल्याने, व त्या विचारसरणीशी मीही एकरूप झालो असल्याने, मी हे अध्यक्षपद अत्यंत आनंदाने स्वीकारले आहे.

छोट्या-मोठ्या कारणांवरून काही लोक कायदा हातात घेतात नि त्यामुळे हत्या होते. काही जणांची कुटुंबे उद्‌ध्वस्त होतात.याला कारणीभूत असतात काही समाजकंटक ! अशाच प्रकारचे कितीतरी सामाजिक नि राष्ट्रीय प्रश्न मानवनिर्मितच असतात. या साऱ्या समस्यांचे चित्र साहित्यात उमटायला हवे; कारण 'साहित्य म्हणजे समाजजीवनाचा आरसा होय. संतांनी, लोकाभिमुख साहित्यिकांनी व समाजप्रबोधकारांनी साहित्याची प्रचंड शक्ती, त्याचे प्रचंड सामर्थ्य अचूकपणे हेरले होते, ओळखले होते. यासाठीच त्यांनी या माध्यमाचा समर्थपणे उपयोग केला.

आज भेदभावना निर्माण करणाऱ्या काही अनिष्ट, समाजविघातक प्रवृत्ती आपला एकसंध समाज दुभंगू पाहत आहेत. आपल्या देशाच्या प्रतिभेत व प्रज्ञेत जगातील तिसरी शक्ती होण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे. बंधुत्वात दडलेली एकात्मतेची भावना व तिचे प्रचंड सामर्थ्य सर्वांच्या मनात जागविणे, ही आजच्या काळाची फार मोठी गरज आहे हे काम साहित्यिकांनीच करायला हवे. 'पसायदाना'त व्यक्त केल्याप्रमाणे बंधुत्वाच्या कक्षा विश्वबंधुत्वापर्यंत रुंदावायला हव्यात, हा संदेश



'राष्ट्रीय बंधुता साहित्य संमेलना'च्या निमित्ताने समाजाच्या विविध घटकांपर्यंत पोचला, तरी या संमेलनाचे सार्थक झाले, असे मी समजेन.''

## जगातील प्रथम अर्धमानव अर्धयंत्र 'सायबोर्ग' वारविक यांच्या करामती

जगातील पहिले 'अर्धमानव अर्धयंत्र' (सायबोर्ग) असलेले ब्रिटिश शास्त्रज्ञ प्रा. केव्हिन वारविक यांनी संगणकाची चिप मानवी शरीरात रोपण केल्यावर ती काय चमत्कार करू शकते याची कल्पना देणाऱ्या, स्वत:वर केलेल्या प्रयोगाची माहिती सांगून, विचार करणारा यंत्रमानव नवी दिल्ली येथे श्रोत्यांपुढे सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.

प्रा. वारविक ब्रिटनमधील रीडिंग विद्यापीठात 'सायबरनेटिक्स' विभागाचे प्राध्यापक असून, त्यांनी १९९८ मध्ये स्वत:च्या डाव्या हातात सिलिकॉन चिपचे रोपण करून विज्ञान जगताला थक्क केले. १९९९ मध्ये त्यांच्या 'इंटरनेट रोबो शिक्षण' प्रयोगाची 'गिनिज बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाली. त्यांचे जगातील पहिला 'सायबोर्ग' असे वर्णन केले जाते.

दिल्ली येथील ब्रिटिश कौन्सिलच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भाषणात प्रा. वारविक म्हणाले की हातात रोपण केलेल्या चिपच्या साह्याने संगणकाद्वारे संदेश अमेरिकेतून पाठवून लंडनमध्ये दिव्यांची उघडझाप करणे, व्हीलचेअर हलविणे, कॉफी तयार करणे, इ. प्रयोग यशस्वी झाले. रीडिंग विद्यापीठातील प्रयोगशाळेतील प्रात्यक्षिके व त्यांच्यावर झालेली शस्त्रक्रिया दाखवून प्रेक्षकांना चकित केले. त्यांनी बरोबर दोन यंत्रमानव आणले होते. एक पूर्वादेश देण्यात आलेला (प्री प्रोग्रॅम्ड) व दुसरा विचार करणारा (थिंकिंग रोबो). दुसऱ्या प्रकारचा यंत्रमानव समोर अडथळे आल्यास स्वत:हून आपला मार्ग कसा काढतो, याचेही प्रात्यक्षिक दाखविले.

प्रा. वारविक म्हणाले, **''माझ्या हातावर शस्त्रक्रिया करून माझे विचार चिपद्वारे चार हजार किलोमीटर दूर पाठविण्याचा प्रयोग सफल झाला. तथापि, आता मला मेंदूत चिपचे रोपण करावयाचे आहे. मी साठ वर्षांचा होईपर्यंत हा प्रयोगही झालेला असेल. माणसाला या तंत्रज्ञानाद्वारे आपली स्वप्नेही संगणकावर 'डाऊनलोड' करता येतील.''**

ते म्हणाले, ''माणसाचा कोणत्याही प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सीमित असतो; परंतु यंत्रमानव व संगणक मात्र हजारो पर्याय शोधू शकतात. त्याचा व मानवाचा संगम झाला, की माणसालाही तिसरा नेत्र असल्यासारखी वेगळी दृष्टी येईल; चिपच्या रोपणामुळे अपंग; तसेच मेंदूचे विकार असलेल्या व्यक्तींना सामान्य जीवन जगणे शक्य होईल.''

अतिनील किरणे माणसाला साध्या डोळ्यांनी दिसू शकत नाहीत; परंतु यंत्रमानवाला ती दिसतात, असे सांगून त्यांनी रिडींग विद्यापीठात केलेल्या एका प्रयोगाची माहिती दिली. ते म्हणाले, ''माझ्यामागे एका यंत्रमानवाने दोन मीटर अंतर राखून चालायचे अशी रचना करण्यात आली. आम्ही दोघेही चालू लागलो. माझ्या पाठीवर असलेल्या यंत्रातून यंत्रमानवाला काही संदेश मिळत होते. आम्ही एक किलोमीटर चाललो असू; परंतु एकाएकी लख्ख ऊन पडले आणि त्यातील ही किरणे रोबोवर पडताच तो मधेच कोलमडला.'' रोबोचे नाव रॉजर होते व प्रयोगाचे नाव 'हाफ मॅरॅथॉन रोबो' असे होते. प्रा. वारविक हसत म्हणाले, ''धिस वॉज द वर्ल्ड्स फर्स्ट रोबो वुईथ ॲथेलेटिक इंजुरी.''

प्रा. वारविक यांनी १९९८ नंतर मार्च २००२ मध्ये पुन्हा चिपचे रोपण केले. आपल्या पत्नीच्या हातावर संदेशवाहक (मायक्रोन्यूरोग्राफी) लावून तिला संदेश पाठविले. 'सायबोर्ग'चे

भवितव्य काय, असे विचारता ते म्हणाले, ''टर्मिनेटर चित्रपटातील शेवटच्या वाक्याप्रमाणे अॅज फार अॅज सायबोर्ग इज कर्न्सर्न्ड, आय विल बी बॅक.'' भविष्यात यंत्रमानव माणसावर प्रभुत्व गाजविण्याची शक्यता आहे काय, असे विचारता ते म्हणाले, ''प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांनीही तशी भीती व्यक्त केली आहे. सध्या अमेरिकेत उंदरांमध्ये चिपचे रोपण करून त्यांच्या हालचाली रिमोट कंट्रोलने नियमित करण्याचे प्रयोक सुरू आहेत. तसा प्रयोग अद्याप माणसावर झालेला नाही; परंतु विज्ञानाचा उपयोग कशा प्रकारे करावयाचा, हे सर्वस्वी माणसाच्या हातात आहे. त्याचा उपयोग माणसाच्या वेगवेगळे रोग, व्यथा, वकलांगता आदी पूर्णपणे बऱ्या करण्यासाठी करता येईल.'' या प्रसंगी प्रा. वारविक लिखित 'आय, सायबोर्ग' या पुस्तकाचे प्रकाशनही झाले.

## 'दत्तो वामन' चरित्रग्रंथाद्वारे सांस्कृतिक ठेव सामान्यांपर्यंत'

महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्यावरील 'दत्तो वामन' या चरित्रग्रंथाद्वारे महाराष्ट्राची सांस्कृतिक ठेव सर्वसामान्यांपर्यंत पोचविण्यात आली असल्याचे मत पुणे विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या माजी प्रमुख डॉ. सरोजा भाटे यांनी व्यक्त केले.

पोतदार कुटुंबाच्या तीन पिढ्यांचा संबंध असलेल्या पुणे नगर वाचन मंदिरात द. वा. पोतदार यांच्या तेविसाव्या स्मृतिदिनी हा प्रकाशन समारंभ झाला. त्यांच्या स्नुषा शुभलक्ष्मी ना. पोतदार यांनी हा चरित्रग्रंथ लिहिला आहे. सुरेशचंद्र पाध्ये प्रमुख पाहुणे होते. डॉ. भाटे म्हणाल्या, ''हा आदर्श चरित्रग्रंथ आहे. 'चरित्रग्रंथाचा आर्दश वस्तुपाठ ठरावा, असे हे पुस्तक अनेक पुस्तकांचा ठेवा आहे. सर्वसामान्य वाचकांना सकस, पोषक वाचन केल्याचे समाधान त्यातून मिळणार आहे.''

पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मा. शं. सोमण यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. पुष्पा लिमये यांनी, तर आभारप्रदर्शन श. ग. ठकार यांनी केले.

## शेक्सपियर सर्वश्रेष्ठ

ज्यांच्या कर्तृत्वाचा अवघ्या ब्रिटनला अभिमान वाटावा, अशा गेल्या पाच शतकातील शंभर सर्वश्रेष्ठ ब्रिटिश व्यक्तींची निवड बीबीसी या दूरचित्रवाणी वाहिनीने एका पाहणीत केली असून, त्यातील पहिल्या दहा मान्यवरांमध्ये विल्यम शेक्सपियर, विन्स्टन चर्चिल, चार्ल्स डार्विन, जॉन लेनन, युवराज्ञी डायना, आयझॅक न्यूटन यांचा समावेश आहे.

नोव्हेंबर आणि डिसेंबर २००१ या काळात दूरध्वनी आणि इंटरनेटच्या सहाय्याने केलेल्या या पाहणीत ३३००० लोकांनी मतदान केले. सर्वश्रेष्ठ दहा व्यक्तींमध्ये समावेश होण्यासाठी एक हजार मते आणि शंभर व्यक्तींमध्ये समावेश होण्यासाठी शंभर मतांची आवश्यकता होती. विशेष म्हणजे पहिल्या दहा व्यक्तींमध्ये सध्या हयात असलेल्या एकाही व्यक्तीचा समावेश नाही.

पहिल्या दहा सर्वश्रेष्ठ व्यक्तींमध्ये होराशियो नेल्सन, राणी एलिझाबेथ पहिली, ब्रुनेल, ऑलिव्हर क्रॉमवेल यांचाही समावेश आहे. एर्नेस्ट शॅकल्टन, जेम्स कूक यांचा अनुक्रमे अकरावा आणि बारावा क्रमांक आहे.

मार्गारेट थॅचर या एकमेव महिला पंतप्रधान आणि डेव्हिड बेकहॅम तसेच बॉबी मूर या दोनच खेळाडूंना या यादीत स्थान मिळाले आहे. राणी एलिझाबेथ दुसऱ्या आणि पंतप्रधान टोनी ब्लेअर यांना अनुक्रमे २४ आणि ६७ या क्रमांकावर समाधान मानावे लागले आहे.



'बीबीसी'वर या दहा मान्यवरांच्या सर्वश्रेष्ठतेची क्रमवारी जाहीर करून या दहा व्यक्तींवर आधारित प्रत्येकी एक तासाचा माहितीपटही दाखविण्यात आला.

## स्त्रियांच्या समस्या नाटकांतून लिहिणे आवश्यक : लालन सारंग

''स्त्री नाटककारांची संख्या अजूनही कमी आहे. स्त्रियांनी त्यांच्या समस्या नाटकांतून लिहिणे आवश्यक आहे,'' असे मत ज्येष्ठ अभिनेत्री लालन सारंग यांनी व्यक्त केले.

स्नेहवर्धन प्रकाशनातर्फे डॉ. मधुरा कोरान्ने यांच्या 'स्त्री नाटककारांची नाटके' या पुस्तकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी गो. रा. जोशी होते.

लालन सारंग म्हणाल्या, ''दीडशे वर्षांतील ऐंशी स्त्री नाटककारांची या पुस्तकामुळे ओळख होते. तथापि ही संख्या कमी आहे. पुरुष नाटककारांनीच स्त्रियांच्या भूमिका रेखाटल्या आहेत. स्त्रियांनीच लिहिलेल्या नाटकांमधून स्त्रियांच्या समस्यांचे बारकावे समाजासमोर येतील.''

श्री. चंद्रशेखर बर्वे म्हणाले,''उपेक्षित, दुर्लक्षित अशा विषयाकडे वळून लेखिकेने मराठी अभ्यासक, समीक्षक, नाटककारांचे लक्ष वेधून घेतले आहे. चित्रपटसृष्टी, रंगमंचावर आज लेखन, दिग्दर्शन, प्रकाशयोजना, नेपथ्य यामध्ये स्त्रिया दिसू लागल्या आहेत. नाट्यलेखन करणाऱ्या स्त्रिया कमी का आहेत, याची गंभीरपणे चर्चा व्हावयास हवी.''

डॉ. कोरान्ने म्हणाल्या, ''पुरुष नाटककारांनी त्यांच्या मनोभूमिकेतून स्त्रियांचे चित्र रंगविले आहे. हे काम स्त्रियांनी प्रभावीपणे करण्याची गरज आहे.''

डॉ. नीलिमा गुंडी यांनी प्रास्ताविक केले. प्रकाशिका डॉ. स्नेहल तावरे यांनी आभार मानले.

## ग्रंथालयांच्या विकासासाठी समितीचा अहवाल सादर

ग्रंथालय सेवकांसाठी वेतनश्रेणी, ग्रंथालय चळवळीच्या विकासासाठी ग्रंथालय कर बसविण्याची आणि ग्रंथालयाच्या अनुदानात भरीव वाढ करण्याची शिफारस राज्य ग्रंथालय समितीने केली आहे. समितीने आपला अहवाल मंत्रालयात उच्च व तांत्रिक शिक्षणमंत्री दिलीप वळसे पाटील यांना सादर केला.

येत्या दहा वर्षात गाव तेथे ग्रंथालय स्थापन करण्याच्या उद्देशाने उपाययोजना करण्याची शिफारसही केली असल्याने समितीचे अध्यक्ष व्यंकप्पा पतकी यांनी पत्रकारांना सांगितले. ग्रंथालयावर सध्या राज्य सरकार दरसाल १५ कोटी रुपये खर्च करते. ही तरतूद २५ कोटी रुपयांनी वाढवून ४० कोटी रुपये करण्यात यावी. शिक्षणाच्या एकूण खर्चापैकी किमान ६ ते १० टक्के खर्च ग्रंथालयासाठी खर्च करण्यात यावा अशाही शिफारसी समितीने केल्या आहेत.

ग्रंथालय कर्मचाऱ्यांसाठी समितीने ज्या वेतनश्रेणी सुचविल्या आहेत. नव्या ग्रंथपालासाठी दरमहा चार हजार ते सहा हजार रुपये, सहाय्यक ग्रंथपालासाठी ३२०० ते ४९०० रुपये, कारकुनासाठी ३५०० ते ४५९० आणि शिपायासाठी २५५० ते ३२०० रुपये अशी वेतनश्रेणी आहे.

## साहित्यातील मूल्यांपेक्षा विपणनाला आलेले महत्त्व ही चिंतेची बाब

साहित्यातील मूल्यांपेक्षा त्याच्या विपणनाला (मार्केटिंग) अवास्तव महत्त्व आले आहे. आजच्या साहित्याला मार्केटिंगवर अवलंबून राहावे लागत आहे त्यामुळे येणारा काळ साहित्यासाठी व त्यातून निर्माण होणाऱ्या निकोप समाजासाठी अत्यंत चिंतेचा आहे, अशी खंत राज्य साहित्य-

संस्कृती मंडळाचे अध्यक्ष प्राचार्य रा. रं. बोराडे यांनी व्यक्त केली.

लोकसाहित्य संशोधन मंडळ व पवन प्रकाशन, परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने लेखिका डॉ. शैला लोहिया यांच्या 'कविता गजाआडच्या' आणि मनतरंग (ललित) या पुस्तकाचे विमोचन दि. ८ रोजी औरंगाबाद येथे झाले.

आजकाल विपणनाचे विविध मार्ग आहेत; त्यापैकी साहित्य संमेलन हे एक माध्यम आहे. त्यात लोकांसमोर आपल्या कवितांचे वाचन करावे लागते. काही साहित्यिक स्वत: विपणन करीत नसल्याचा आव आणतात; त्यांचा परिवार त्यांच्या वतीने विपणन करतो. अशा सहित्यिकांचा वाङ्मयीन गुणवत्तेशी कोणताही संबंध नाही. ही वृत्ती वाढली तर खरी वाङ्मयीन गुणवत्ता दुलर्क्षित राहील; नव्हे तिची वाढच होणार नाही, असे प्रा. बोराडे म्हणाले.

## पाचव्या समरसता संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रभा गणोरकर

डिसेंबरमध्ये पुण्यात होणाऱ्या पाचव्या समरसमता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री आणि समीक्षक प्रभा गणोरकर यांची निवड झाली आहे. संमेलनाचा मुख्य विषय 'स्त्री साहित्य आणि समरसता' हा आहे, अशी माहिती समरसता साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. अनंत तोरो यांनी दिली. ते म्हणाले, ''गेली चार वर्षे समरसता साहित्य परिषदेतर्फे विषयनिष्ठ साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्षी 'स्त्री साहित्यिकांच्या साहित्यातून दिसून येणारे समरसतेचे प्रतिबिंब' या विषयाचा आढावा घेतला जाईल. तसेच संमेलनात 'भारतीय संदर्भात स्त्रीवादाचा विचार', 'स्त्री समस्यांचे साहित्यातील प्रतिबिंब' आणि स्त्री आत्मचरित्रातून प्रकटलेले स्त्री मानस या विषयावर परिसंवाद होणार आहेत. सात व आठ डिसेंबरला पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात हे संमेलन होणार आहे.''

संमेलननिमित्त 'प्रसार माध्यमातील स्त्री प्रतिमा', 'मराठी साहित्यातील नायिकांची बदलती रूपे' आणि 'स्त्रीवादाचा भारतीय संदर्भातील विचार' या विषयांवर निबंध स्पर्धा होणार आहे. अधिक माहितीसाठी शुभांगी तांबट अथवा हेमा वैद्य, १४२६, शुक्रवार पेठ, जोशी वाडा, पुणे २ येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## 'प्रसन्न मन:स्थितीसाठी चांगल्या गोष्टींशी मैत्री करा'

''प्रसन्न मन:स्थितीसाठी चांगल्या गोष्टींशी मैत्री करा, दुसऱ्यांच्या दु:खाबद्दल अनुकंपा बाळगा, चांगल्या कामात आनंदाने सहभागी व्हा व विघातक गोष्टीची उपेक्षा करा,'' असा सल्ला डॉ. ह. वि. सरदेसाई यांनी दिला.

हेल्थ केअर ट्रस्टतर्फे डॉ. दिलीप देवधर यांनी लिहिलेल्या 'आनंदी वृद्धत्व' व 'वृद्धत्वाशी मैत्री' या पुस्तकांचे प्रकाशन डॉ. सरदेसाई व 'सकाळ'चे संपादक अनंत दीक्षित यांच्या हस्ते झाले. डॉ. सरदेसाई म्हणाले, ''वाढत्या वयाबरोबर शरीरामध्ये बदत होतात. त्यातून पाठदुखी, टाचा, गुडघेदुखी आदी तक्रारींना सुरुवात होते. त्यासाठी छोटे व्यायामप्रकार अगदी थोडा वेळ नियमितपणे केले तर त्याचा उपयोग होतो. जेवणाच्या, झोपेच्या वेळांमध्ये अनियमितपण टाळावा. आहारात पालेभाज्यांचा समावेश केल्यास आरोग्याच्या अन्य तक्रारीही दूर होतात.''

पुस्तकाचे लेखक डॉ. देवधर यांनी या पुस्तकांच्या निर्मितीची पार्श्वभूमी स्पष्ट केली. ट्रस्टचे विश्वस्त डॉ. आनंद गोखले व डॉ. श्याम दामले यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आलोक देवधर यांनी सूत्रसंचालन केले, तर दीप्ती देवधर यांनी आभार मानले.



## वृद्धत्वाचे नियोजन हवे

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटना (ॲस्कॉप) व ज्येष्ठ नागरिक संघाचा महासंघ, महाराष्ट्र (फेस्कॉम), पुणे विभाग यांच्या वतीने धामणकर स्मृती व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी ॲड. भास्करराव आव्हाड प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. के. बी. ग्रँट उपस्थित होते.

''वृद्धत्वाचे नीट नियोजन करा. समाजाला आजही आपण उपयुक्त आहोत, हे पटवून द्या. म्हणजे नव्या पिढीला तुमची अडगळ वाटणार नाही. वाढत्या वयाबरोबर माणसाची कार्यक्षमता कमी झाली, तरी कार्यकुशलता वाढत असते. या कार्यकुशलतेचा उपयोग करून घेतला पाहिजे,'' असे ॲड. आव्हाड यांनी या प्रसंगी सांगितले.

'आचारसंहिता' व 'निर्देशिका' या पुस्तकांचे प्रकाशन फोर्बज मार्शलच्या संचालिका रती फोर्बज यांच्या हस्ते झाले. 'ॲस्कॉप'चे कार्याध्यक्ष डॉ. वसंत मुन्शी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. शशिकांत करंदीकर, गणेश मोकाशी, बापू गोखले यांचीही भाषणे झाली.

## प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची फलटणमध्ये ग्रंथतुला

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य शिवाजीराव भोसले यांची त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त तीन नोव्हेंबरला ग्रंथतुला करण्यात आली. इंदिरा गांधी सांस्कृतिक केंद्रात झालेल्या या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्राचार्य भोसले यांच्या नावे सुरू करण्यात येणाऱ्या सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटनही श्री. पवार यांच्या हस्ते झाले. या ग्रंथतुला समारंभासाठी विविध विद्यापीठांचे कुलगुरू, विविध क्षेत्रांतील ७५ मान्यवर, साहित्यिक यांनाही निमंत्रित करण्यात आले होते.

## छंद कवितेचा जपणारा रिक्षाचालक

चरितार्थ चालवताना आपला छंदही कसा जोपासता येतो, याचे रिक्षाचालक राजेंद्र पोतदार हे एक उत्तम उदाहरण ठरावे. त्यांनी आगळ्यावेगळ्या पद्धतीने काव्यलेखनाची आवड जोपासली आहे. त्यांच्या रिक्षाच्या (एमएच १२ क्यूए ११०८) मागे लावलेल्या फलकावर नेहमी खास शैलीतील कविता दिसून येते. गेली सहा वर्षे ते हा उपक्रम राबवीत आहेत.

त्या त्या वेळच्या परिस्थितीवर भाष्य करणाऱ्या, राजकारणावर उपहासात्मक टीका करणाऱ्या, विडंबनात्मक, आयुष्यातील चढउतार, भावभावनांचे खेळ व्यक्त करणाऱ्या त्यांच्या या कवितांना लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.

साहित्य परिषदेतील चौकातील फलकावरही दर आठवड्याला ते एक कविता लिहितात. श्री पोतदार यांना नाशिकच्या यशवंतराव चव्हाण विद्यापीठाचा 'विशाखा पुरस्कार' मिळाला आहे. 'क्षणमित्रा' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. ते म्हणतात; ''कवितेच्या ओळी मनात रुंजी घालत असतानाच बँकेच्या हप्त्यांचीही आठवण ठेवावी लागते. कारण संसाराच्या जबाबदाऱ्या तर टाळता येत नाहीत.''

### सातारा जिल्हा परिषदेचा अभिनव उपक्रम

वाचनाची संस्कृती अधिक वाढावी, यासाठी सातारा जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यातील शाळांना केलेल्या आवाहनास मोठा प्रतिसाद मिळत आहे.

जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) दिनकरराव पाटील यांनी या उपक्रमांची माहिती दिली. जिल्हा परिषदेच्या वतीने दर वर्षी होणाऱ्या ग्रंथमहोत्सवामुळे शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास अधिक मदत झाली आहे. गेल्या महिन्यात जिल्ह्यातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांच्या तालुकावर सभा झाल्या. प्रत्येक मुख्याध्यापकाने दरमहा किमान १५० रुपये किंमतीची पुस्तके स्वत:साठी विकत घ्यावीत, असे आवाहन या सभांमध्ये करण्यात आले होते. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळू लागला आहे, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

प्रत्येक शाळेमध्ये प्रत्येक आठवड्यात एकदा एका शिक्षकाने आपण वाचलेल्या पुस्तकाची माहिती सर्व विद्यार्थ्यांसमोर द्यावी असाही उपक्रम आखण्यात आला. या उपक्रमात प्रत्येक शिक्षकाने सहभागी व्हावे; पुस्तकाविषयी पाऊण तास बोलावे, असे ठरले; त्यामुळे विद्यार्थ्यांना चांगल्या पुस्तकांची माहिती मिळते; तसेच वक्तृत्व कलेचाही सराव होऊ शकतो. याही उपक्रमास सर्व शाळांमधून चांगला प्रतिसाद आहे, असे श्री. पाटील यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेच्या वतीने, शाळा सुरू होताना प्रत्येक शाळेत ग्रंथप्रदर्शन भरविण्याचा उपक्रम आयोजित केला होता. ग्रंथालयात सर्व पुस्तके मुलांसाठी मांडून ती सर्वांना पाहता यावीत, असे ठरविण्यात आले होते. त्यानुसार अनेक विद्यार्थ्यांना पुस्तकांची निवड करता आली. त्यांनतर ही पुस्तके वर्षभरात वाचली जावीत, असे नियोजन करण्यात आले. हा उपक्रम वाचनसंस्कृती वाढवण्यास उपयुक्त ठरल्याचे श्री. पाटील यांनी नमूद केले.

### भास्करबुवा बखले यांची गानपरंपरा नव्या पिढीपर्यंत पोचवावी : नौशाद

''संगीताचे विकृतीकरण मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या सध्याच्या काळात भास्करबुवा बखले यांसारख्या महान व्यक्तीच्या गानपरंपरेची ओळख नव्या पिढीला करून देण्याची गरज आहे.'' असे मत ज्येष्ठ संगीतकार नौशाद यांनी व्यक्त केले.

शैला दातार यांनी लिहिलेल्या 'देवगंधर्व' या भास्करबुवा बखले यांच्या चरित्राच्या डॉ. श्रीरंग संगोराम यांनी केलेल्या हिंदी अनुवादाचे प्रकाशन त्यांनी केले. शालेय शिक्षणमंत्री प्रा. रामकृष्ण मोरे अध्यक्षस्थानी होते. ज्येष्ठ अभिनेते ए. के. हंगल, महाराष्ट्र हिंदी अकादमीचे अध्यक्ष नंदकिशोर नौटियाल, देवगंधर्व बखलेबुवा ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. दीपक टिळक, आदी या वेळी उपस्थित होते.

संगीताची मोठी परंपरा आपल्याला लाभली आहे; पण पॉप संगीताच्या नादी लागून संगीताला भ्रष्ट करत आहोत, अशी खंत श्री. नौशाद यांनी व्यक्त केली. ते म्हणाले, ''भास्करबुवा हे महान संगीतकार होते. त्यांचे संगीत आपण आजही विसरू शकत नाही. हिंदीतील अनेक बंदिशी त्यांनी मराठीत आणल्या. त्या आपण जतन करून ठेवल्या पाहिजेत. नव्या पिढीला हे संगीत ऐकविले पाहिजे.''

प्रा. मोरे म्हणाले, ''पॉप संगीताची सध्या चलती असली तरी शास्त्रीय संगीत हे चिरंतन टिकणारे आहे. त्यामुळे भास्करबुवा यांचे नाव सतत स्मरणात राहील. 'देवगंधर्व' ग्रंथ फक्त बखलेबुवांपुरता मर्यादित नाही, तर संपूर्ण शास्त्रीय संगीताशी संबंधित आहे.''

उस्ताद बडे गुलाम अली खाँ यांनी पुण्यात रंगविलेल्या एका मैफलीची आणि तीत त्यांनी



भास्करबुवा यांनी केलेल्या कौतुकाची आठवण अभिनेते चंद्रकांत गोखले यांनी सांगितली.

### ध्येयवेडातून ध्येयसिद्धी शक्य : डॉ. अशोक कोळस्कर

निरंतर परिश्रम, दीर्घोद्योग, कष्ट करण्यामुळे आणि एखाद्या विशिष्ट ध्येयवेडातून व्यक्ती ध्येयसिद्धी करू शकते, असे प्रतिपादन पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अशोक कोळस्कर यांनी केले. प्रा. विलास आढाव लिखित 'विचारवैभव' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते म्हणाले, सर्वसामान्य माणसातून असामान्य माणसे निर्माण होऊ शकतात, त्यासाठी जिद्द, चिकाटी आणि परिश्रम करण्याची गरज आहे. सुयश प्रकाशनच्या रुपाली अवचरे यांनी प्रास्ताविक केले.

### वाईट गोष्टी नाकारण्याची क्षमता प्रत्येकाने वाढविण्याची गरज - फुटाणे

रांगडे राज्यकर्ते व निष्क्रिय बुद्धीवादी यामुळे आपल्या समाजाचे भवितव्य अंध:कारमय होत चालले आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी सर्वांनीच वाईट परिस्थिती नाकारण्याची क्षमता वाढविणे आवश्यक आहे, असे मत 'वात्रटिका'कार रामदास फुटाणे यांनी पिंपरी येथे व्यक्त केले.

सामान्य माणसापुढे आज कोणताही आदर्श नाही. दूरचित्रवाणी वाहिन्यांवरून पाश्चात्त्य संस्कृतीचे अतिक्रमण सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काय स्वीकारायचे व काय नाकारायचे याचे भान ठेवणे आवश्यक आहे. चांगले निवडण्याची व वाईट नाकारण्याची क्षमता वाढली पाहिजे. त्यासाठी मुले व पालक यांच्यात सुसंवाद असला पाहिजे.

देशातील राजकारण, अर्थकारण, धर्मकारण यावर त्यांनी आपल्या खास शैलीत भाष्य करून काही वात्रटिका सादर केला. 'टेल्को कलासागर'मुळे कामगार व व्यवस्थापन यांच्यात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले आहेत, असे उद्गार त्यांनी काढले.

'टेल्को कलासागर'च्या २२ व्या दिवाळी अंकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते झाले. टेल्कोचे वरिष्ठ उपाध्यक्ष प्रकाश तेलंग, वासुदेव गुजराथी, मनोहर पारळकर, टेल्को एम्प्लॉईज युनियनचे सुजित पाटील व सुरेश फाले उपस्थित होते.

दिवाळी अंकाच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या कथा - कविता स्पर्धेतील विजेत्यांना फुटाणे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

### केशवसुत स्मृती प्रकल्पाची स्थापना

आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत यांच्या स्मृतिशताब्दीपूर्वीच त्यांच्या साहित्यिक कार्याची ओळख नव्या पिढीला करून देण्याच्या उद्देशाने 'केशवसुत स्मृती प्रकल्पा'ची स्थापना करण्यात आली आहे. केशवसुत यांच्या निधनास इ. स. २००५ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होतील. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा, कार्याचा परिचय आधुनिक काळात सर्वदूर करून देण्याच्या उद्देशाने केशवसुत स्मृती-प्रकल्पाने काम सुरू केले आहे. त्यांची माहिती देवरूखचे प्राचार्य डॉ. सुरेश जोशी यांनी दिली. सात नोव्हेंबर हा केशवसुतांचा स्मृतिदिन असतो. स्मृतिशताब्दी वर्ष ही त्या दृष्टीने मोठी संधी आहे, ''सुदैवाने केशवसुत या नावाला राज्यभर सर्वमान्यता आहे. जुने कवी, नवीन कवी, दलित आणि अदलित ग्रामीण आणि नागर, कलावादी आणि सामाजिक बांधिलकी पुरस्कारणारे अशा विविध स्तरांवर त्यांच्या नावाला असणारी मान्यता ही अशा व्यापक पातळीवरील प्रकल्पास उपयुक्त व

उमेदीची बाब ठरू शकते. महाराष्ट्राच्या अस्मितेचा पडताळा घेण्यासाठीही असे राष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न महत्त्वाचे ठरू शकतात.''

सर्व क्षेत्रातील जाणकारांनी एकत्र येऊन पुढील प्रकल्प हाती घ्यावेत व अमराठी माणसांना केशवसुतांची थोरवी पटवून देण्याचे काम करावे. रवींद्रनाथ टागोर, इक्बाल, गालिब, शरच्चंद्र यांच्या कर्तबगारीचा परिचय त्या त्या भाषेच्या आणि प्रांताच्या बाहेर, अखिल भारतीय पातळीवर अनेकांना आहे त्याच धर्तीवर केशवसुतांच्या आणि इतर ज्येष्ठ साहित्यिकांच्या संदर्भात असे प्रयत्न होण्याची गरज आहे. मराठी भाषेतील श्रेष्ठ साहित्यकृती इतर भाषेत, विशेषत: हिंदी आणि इंग्रजी भाषेत, अनुवादित व्हाव्यात या दृष्टीने आपण पुरेसे जागरूक नाही.

नॅशनल बुक ट्रस्ट आणि साहित्य अकादमी यांना केशवसुतांची कविता हिंदी आणि इंग्रजी भाषेत अनुवादित करण्यासाठी प्रवृत्त करणे, त्यांच्या नावे आधुनिक मराठी कवितेचे अध्यासन मुंबई विद्यापीठात सुरू करणे. त्याची व्यवस्था रत्नागिरी उपकेंद्राद्वारे मालगुंड येथील केशवसुत स्मारक भवनात करता येण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाकडून विशेष अनुदान मंजूर करून घेणे, तसेच शिक्षकदिनी दामले मास्तर म्हणून प्रसिद्ध असलेल्या केशवसुतांच्या नावे 'दामले मास्तर' पुरस्कार सुरू करणे, त्यांच्या स्मरणार्थ पोस्टाचे टपाल तिकीट छापणे, मुंबई ते मडगाव या एक्स्प्रेसला 'केशवसुत एक्स्प्रेस' असे नाव देणे, स्टिकर्स, वह्या काढणे आदी मागण्या आहेत.

**संपर्क :** डॉ. सुरेश दामोदर जोशी, प्राचार्य निवास,मधली आळी, देवरुख, जि. रत्नागिरी ४१५८० फोन ४०४०७

**देशभक्त केशवराव जेधे स्मृतिग्रंथाचे डिसेंबरमध्ये प्रकाशन**

देशभक्त केशवराव जेधे स्मृतिग्रंथ प्रकाशित करण्यात येणार असून, माजी केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण, मोहन धारिया, प्रा. ग. प्र. प्रधान, मा. पु. मंगुडकर आदींचे लेख यात समाविष्ट करण्यात येणार आहेत. या ग्रंथाचे संपादक संताजी जेधे व कार्यकारी संपादक अशोक नायकवडे हे आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे सहकारी कान्होजी जेधे यांच्यावरील ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात येणार आहे.

या दोन्ही ग्रंथांसाठी

**संपर्क :** जेधे मॅन्शन, शुक्रवार पेठ, पुणे - २




# अभिनंदन!

**'गटुळं' कादंबरीस भि. ग. रोहमारे ग्रामीण साहित्य पुरस्कार**

रवींद्र बागडे यांच्या 'गटुळं' कादंबरीस उत्कृष्ट आत्मकथनात्मक लेखनाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा कार्यक्रम दि. ७ डिसेंबर २००२ रोजी के.जे. सोमय्या महाविद्यालय, कोपरगाव येथे माजी केंद्रीय गृहमंत्री मा. शंकरराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध साहित्यिक द. मा. मिरासदार व ना. धो. महानोर यांच्या शुभहस्ते प्रदान केला गेला. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. हे पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले आहे.

**लेखक रवींद्र बागडे यांचे हार्दिक अभिनंदन!**



**एक खास आकर्षक सवलत योजना**

# स्टार योजना

**सिल्व्हर स्टार गट - ५०० रुपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला २०० रुपयांची पुस्तके मोफत !**

**गोल्डन स्टार गट - १००० रुपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला ४५० रुपयांची पुस्तके मोफत !**

**डायमंड स्टार गट - २००० रूपयांची खरेदी करणाऱ्या ग्राहकाला १००० रुपयांची पुस्तके मोफत !**

**मुदत फक्त ३१ जानेवारी २००३ !**

**मोफत पुस्तके फक्त स्टॉक असेपर्यंतच !**

## मोफत पुस्तकांची यादी

| **रणजित देसाई** | |
|---|---|
| माझा गाव | १५०/- |
| प्रतिक्षा | ८०/- |
| शेकरा | ६०/- |
| लक्ष्यवेध | ८०/- |
| मोरपंखी सावल्या | ६०/- |
| कातळ | ९०/- |
| प्रपात | ९०/- |
| संचित | ६०/- |
| **वि. स. खांडेकर** | |
| गडकरी : व्यक्ती आणि वाङ्मय | २००/- |
| वामन मल्हार जोशी : व्यक्ती विचार | ८०/- |
| आगरकर : व्यक्ती आणि विचार | ८०/- |
| पाकळ्या | ७०/- |
| दवबिंदू | ६०/- |
| झीमझीम | ५५/- |
| प्रीतीचा शोध | १५०/- |
| घरट्याबाहेर | ८०/- |
| प्रसाद | १४०/- |

| **आनंद यादव** | |
|---|---|
| भूमिकन्या | ९०/- |
| झाडवाटा | ९०/- |
| सैनिक हो, तुमच्यासाठी | २०/- |
| स्पर्शकमळे | १००/- |
| **निरंजन घाटे** | |
| निसर्गपुत्र | ८०/- |
| वेध पर्यावरणाचा | १५०/- |
| आरोग्य वेध | ४५/- |
| शरीर वेध | ४५/- |
| **तंत्रज्ञानाचे विश्व** | |
| संगणक, यंत्रमानव | २०/- |
| मानवी युद्धसाधने, लेझर्स | २०/- |
| माहिती प्रसार साधने, दळणवळण/वाहतूक | २०/- |
| ज्ञानदीप | ७०/- |
| आत्मवेध (विज्ञान) | १२०/- |
| खेळ आणि विज्ञान | ४०/- |

**ओशो**

| | |
|---|---|
| एक एक पाऊल | ८०/- |

**वि. स. वाळिंबे**

| | |
|---|---|
| एडविना आणि नेहरु : कॅथरिन क्लेमंट | २५०/- |
| कथा ही दिवावादळाची | १००/- |
| जयहिंद आझाद हिंद | १००/- |
| आज इथे : उद्या तिथे | ४५/- |

**तसलिमा नासरिन**

| | |
|---|---|
| फेरा | ७०/- |
| निर्बाचित कलाम | १५०/- |

**शान्ता शेळके**

| | |
|---|---|
| आंधळ्याचे डोळे :नॉर्मन कुझिन्स | १५०/- |
| पावसाआधीचा पाऊस | ९०/- |
| निमित्तानिमित्ताने: राजीव गांधी | ७०/- |
| संस्मरणे | ८०/- |
| रंगरेषा | ८०/- |

**उमा कुलकर्णी**

| | |
|---|---|
| परिशोध : एस. एल. भैरप्पा | १००/- |
| चिदंबर रहस्य : के. पी. पूर्णचंद्र तेजस्वी | १२५/- |
| मायामृग : के.पी.पूर्णचंद्र तेजस्वी | १००/- |
| तंतू : एस. एल. भैरप्पा | ४५०/- |

**माधवी देसाई**

| | |
|---|---|
| नियती | ६०/- |
| शुक्रचांदणी | १००/- |

**अंजनी नरवणे**

| | |
|---|---|
| अणसार : वर्षा अडालजा | १८०/- |
| सागरतीरी : ध्रुव भट | ८०/- |
| वडवाई | २००/- |
| गहाण पडलेली टेकडी : मारिया श्रेस | १२०/- |
| द सिस्टरहुड : कॉलिन फोर्बस् | २५०/- |
| खाना-खजाना | १००/- |

**शिवाजी सावंत**

| | |
|---|---|
| शेलका साज | १२०/- |
| कांचनकण | ७०/- |
| युगंधर श्रीकृष्ण : एक चिंतन | ६०/- |
| मोरावळा | ६०/- |

**इतर लेखकांची**

| | |
|---|---|
| आजचा मेनू | ११०/- |
| ड्रिंक्स व कॉकटेल्स | १२५/- |
| द लास्ट डॉन : मारिओ पुझो | ३५०/- |
| डॉ.झिवागो : बोरिस पास्तरनाक | २५०/- |
| ३००१ द फायनल ओडिसी | १६०/- |
| साक्षी : सरला बार्नबस | १९०/- |
| डिस्क्लोजर : मायकेल क्रायटन | २२०/- |
| द टर्मिनल मॅन :मायकेल क्रायटन | १२०/- |
| काँगो : मायकेल क्रायटन | १६०/- |
| इलाटाज् डायरी : इलाटा फिलीपोविक | ८०/- |
| एकदाच अशी रात्र येते : रॉजर डॉनलॉन | ७०/- |
| अ टेल ऑफ टू सिटीज : चार्ल्स डिकन्स | २७०/- |
| कोमा : रॉबिन कुक | ९०/- |
| संस्कार : यू. आर. अनंतमूर्ती | ८०/- |
| मंदिरा : सुनील गंगोपाध्याय | १२५/- |
| सुंदरबनच्या जंगलात | ६०/- |
| हितगुज : संपा. कॅरेन पेन | २००/- |
| टोकियोच्या नभांगणातील चमकत्या तारका | १८०/- |
| मुंबई... मुंबई! : विक्रम चंद्र | १५०/- |
| झुंज कॅन्सरशी! | ६०/- |
| द्वंद्व : विजयदान देथा | १५०/- |
| चिनी अक्षर साहित्य | १००/- |
| शिदोरी | ५०/- |
| सेंट्रल बस स्टेशन | १००/- |
| दिग्विजय (नेपोलियन बोनापार्ट) | ४००/- |
| रोदँ | २९०/- |
| संचित | ५०/- |
| चितेवरच्या कळ्या | १३०/- |
| फॅक्टरी गेट | १५०/- |
| मूल | ९०/- |
| काशभट | ७०/- |
| प्रवाहातील तारु | १२५/- |
| गाजव्यथा | १००/- |
| इथे फुलांना मरण जन्मता | ८०/- |
| शापित राजहंस | २५०/- |
| अंधाराचे वारसदार | १००/- |
| काट्यावरची पोटं | १००/- |
| मुक्तिशोध-यात्रा | १७०/- |



| | |
|---|---|
| दक्षिणरंग | २५०/- |
| पैलू | १४०/- |
| मद्य नव्हे, हे मंतरलेले पाणी | १२०/- |
| आठवणींचा मोहर | १६०/- |
| उद्याच्या सुंदर दिवसासाठी | १००/- |
| अवती भवती | १२०/- |
| शोध सुखाचा | ८०/- |
| हिमकोंदणातील हिरा | ८०/- |
| आय्. सी. ८१४ अपहरणाचे १७३ तास | १२०/- |
| कारगिलनामा | १६०/- |
| शिलंगणाचं सोनं | २५०/- |
| नागरिक | १५०/- |
| भारतीय राजकारणातील गुन्हेगारी व भ्रष्टाचार | २००/- |
| ख्यातनाम इतिहासकार | १५०/- |
| बिग इगोज,स्मॉल मेन | ८०/- |
| शतदा प्रेम करावे | १२५/- |
| व्यथित मनानं सांगावसं वाटतं की... | १००/- |
| डायाना आणि चार्ल्स | १३०/- |
| सेक्स, स्कॉच, अँड स्कॉलरशिप | १२५/- |
| प्रवाहातील पक्षी | ७५/- |
| बोन्साय | ७५/- |
| अज्ञाताचे विज्ञान (विज्ञान) | १३०/- |
| व्हर्च्युअल रिॲलिटी (विज्ञान) | १५०/- |
| रिंगणावायली मुंगी | १३०/- |
| कावळे आणि माणसं | १००/- |
| शिवार | १००/- |
| झोका | १००/- |
| उत्तरार्ध | १३०/- |
| मनस्विनी | १२०/- |
| खसखशीचा मळा | ७५/- |
| मुळे आणि पाळे | ८०/- |
| कालिंदीच्या तीरावरती | ७५/- |
| शेष-अवशेष | १२५/- |
| इस्कोट | ७०/- |
| लोलक | १००/- |
| गॉरगोनाईज | ५०/- |
| पोस्ट-मार्टेम | १२५/- |
| नक्षत्रांच्या प्रकाशात | १००/- |
| कातरवेळ | ७०/- |
| गुंता सोडविताना | ११०/- |
| वि.स. खांडेकरांची कविता | १३०/- |
| विज्ञानातून लोकसंख्या शिक्षण | ६०/- |
| जिज्ञासेतून विज्ञान | ३५/- |
| पेशीबद्ध जीवन : एक निरंतर प्रवास | ५०/- |
| शास्त्र-गंमत जत्रेत चौकस चिंगी | ७०/- |
| विश्वातील सजीवसृष्टी | ६०/- |
| माहितीचे महामार्ग | ७०/- |
| परिक्षानळीतील जंगले | ४५/- |
| नवचैतन्याचा झरा | ६५/- |
| नवी पिढी नवे राज्य | ६०/- |
| नामशेष झालेले प्राणी | ५०/- |
| सागरातील नवलाई | ८०/- |
| शरीरातील विविध संस्था - | |
| फुप्फुसे, हृदय, मेंदू | २५/- |
| अंत:स्राव, गर्भाशय, जठर | २५/- |
| स्नायू, अस्थि | २५/- |
| सुखद मातृत्व | ७०/- |
| शर्यती स्पर्धा खेळ | १००/- |
| आपण आणि आपले आरोग्य | ७०/- |
| निवृत्त ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्योग व्यवसाय | ४०/- |
| व्यवस्थापनाची गीता | ४०/- |
| बुद्धिबळाचा ओनामा | ८०/- |
| काळ चालला पुढे | ४०/- |
| यशाचा कानमंत्र | ५०/- |
| करोडोंचे सामान्यज्ञान | ८०/- |
| कोटीमोलाची प्रश्नोत्तरे | ७०/- |
| अमृतधारा-संतकाव्यातील वेचे | ७०/- |
| मराठी व्याकरण परिचय | ८०/- |
| मराठी निबंध ज्योती | ८०/- |
| मराठी नाटक : नव्या दिशा नवी वळणे | ७०/- |
| मराठी ग्रामीण साहित्य परिसर आणि प्रवाह | ४०/- |
| दलित साहित्य :प्रवाह आणि प्रतिक्रिया | १००/- |
| स्त्रीसुधारणा विषयक मराठी नाट्यलेखन | २००/- |
| स्वामी : एक शोध | १५०/- |

# श्रद्धांजली

**अजातशत्रू साहित्यिक - वसंत सबनीस**


मराठी रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि साहित्य क्षेत्रातील एक हसतमुख, अजातशत्रू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वसंत सबनीस या चौफेर व्यक्तिमत्त्वाने आयुष्याच्या रंगमंचावरून कायमची 'एक्झिट' घेतली आहे. विलक्षण निरीक्षणशक्ती, अभ्यास आणि तरल विनोदबुद्धी, यामुळे माणसाच्या वागण्यातील साध्या - साध्या गोष्टींमधील विसंगती शोधून तिचा विनोदासाठी वापर करण्याची त्यांची खास हातोटी होती. त्यांना जेव्हा नाट्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले, तेव्हा त्यांनी 'आपल्या निवडीमुळे विनोदी वाङ्मयाला प्रतिष्ठा मिळाली,' असे मनोगत व्यक्त करून विनोदी लेखन कमी दर्जाचे समजले जाते, याबद्दलची टिप्पणीच केली होती. पंढरपुरात त्यांचे बालपण गेले. याच पंढरपुरातील द. मा. मिरासदार आणि वि. आ. बुवा अशा समकालिनांप्रमाणेच तेही विनोदी लेखक म्हणून गाजले. त्यांनी नाट्यलेखन केले, चित्रपटांच्या कथा, पटकथा, संवाद त्यांनी लिहिले. तसेच विनोदी कथाही त्यांनी अतिशय समर्थपणाने लिहिल्या. त्यांनी स्वत:च्या कथांवरूनच अनेक नाटके लिहिली. 'घरोघरी हीच बोंब', 'आतीबाईला मिशा असत्या तर' वरून 'मामला चोरीचा', 'अप्पाजींची सेक्रेटरी' इत्यादी त्यांना विनोदी कादंबरीही लिहायची होती; परंतु ते त्यांचे स्वप्न पूर्ण होण्याआधीच ते आपल्यातून गेले आहेत.

बालपणीच पंढरपुरात आढळलेल्या एका वादग्रस्त व्यक्तीसंबंधात त्यांनी एक नाटक लिहिले आणि त्याच्या प्रयोगानेच त्यांच्या नाट्यलेखनाला सुरवात झाली. तरुणपणी त्यांनी केलेल्या कविता 'अभिरुची' सारख्या गाजलेल्या मासिकात प्रसिद्ध होत असत; पण विनोद हाच त्यांना शेवटपर्यंत भुलवणारा साहित्य प्रकार ठरला. 'चोर आले पाहिजेत' ही त्यांनी आकाशवाणीसाठी लिहिलेली पहिली विनोदी श्रुतिका. 'निळावंतीचा वग', 'माझे घरटे माझी पिल्ले', तसेच 'कार्टी श्रीदेवी' अशी अनेक नाटके त्यांनी रूपांतरकार नात्याने लिहिली. पुढे त्यांनी लोकनाट्य या प्रकाराला एक नवा आयाम मिळवून दिला. 'छपरी पलंग' हा त्यांचा वग पुढे 'विच्छा माझी पुरी करा' या नावाने अजरामर झाला. सुमारे पंचवीस चित्रपट त्यांनी लिहिले. नाटकांची आणि एकांकिकांची त्यांची संख्या मात्र यापेक्षा एकत्रितपणे निश्चितच कितीतरी अधिक आहे. ते स्वत: लेखनाबरोबर अभिनयही करीत .

'सोंगाड्या' या चित्रपटानंतर वसंत सबनीस आणि दादा कोंडके, असे एक समीकरण तयार झाले होते. तसेच समीकरण वसंत सबनीस आणि 'आवाज'चे मधुकर पाटकर, असेही तयार झाले होते. शरद तळवळकर आणि सबनीस, ग.दि.मा. आणि सबनीस, पु.ल.आणि सबनीस, अशीही अनेक समीकरणे तयार झालेली पाहायला मिळतात. अशी आणखीही समीकरणे सांगता येतील. ही सारी समीकरणे जुळली, याचे मुख्य कारण, या सर्वांना ज्याच्याविषयी आपुलकी व प्रेम वाटत होते, असे सर्वांत समान व्यक्तिमत्त्व होते वसंत सबनीस ! सतत हसतमुख अशा या माणसाने आयुष्यभर सर्वांना हसविण्याचे काम केले. राष्ट्र सेवा दलाच्या माध्यमातून काम केल्यामुळे समाजाच्या सामाजिक आरोग्याची काळजी घेणारा कलावंत, साहित्यिक ही त्यांची ओळख न पुसता येणारी आहे. जुन्याचे गोडवे गाताना चांगल्या, आश्वासक नावीन्याचे स्वागत, हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या निधनामुळे एका सभ्य, शालीन, विचारी, समाजहितैषी, अभ्यासू आणि अजातशत्रू अशा व्यक्तिमत्त्वाला आपण कायमचे पारखे झालो आहोत. **(सकाळ, १६ ऑक्टोबर २००२)**



**पुस्तक परिचय**




# चिंतामुक्त जीवन

**लेखक : आर. डी. मुनोत**

**मनावरचा ताण दूर करण्यासाठी आपणच आपल्याला सावरायला हवे**

चिंचवडचे आर. डी. मुनोत हे आता सत्तरीच्या घरात आहेत; शालेय वयात एक हुशार विद्यार्थी म्हणून ते चमकले. १९५४ साली एस. एस. सी. गुणवत्ता यादीत आले. चार वर्षांपूर्वी उच्च रक्तदाबामुळे त्यांना अतिदक्षता विभागात राहावे लागले. त्यावेळी आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री रविशंकर महाराज यांच्या सुदर्शन क्रियेने त्यांना नवजीवन लाभल्याचा प्रत्यय आला. महाराजांच्या इमोशन्स अँड युवर हेल्थ या पुस्तकाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. त्या पुस्तकाचे मराठी रूपांतर करण्याचाा संकल्प सोडून तीन वर्षे त्या संकल्पाच्या पूर्ततेसाठी त्यांनी परिश्रम घेतले. चिंतामुक्त जीवन या नावाने हे रूपांतर मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झाले आहे.

आजच्या आपल्या धकाधकीच्या जीवनात क्षणोक्षणी अनेक समस्यांचा सामना करीतच आपल्याला मार्ग काढावा लागतो; आणि साध्या साध्या गोष्टींमुळेही मनावर ताण पडतो. त्या मानसिक तणवामुळे आपल्या शरीरावरचाही ताप वाढतो. त्यामुळे वेगवेगळ्या तक्रारी उद्भवतात. हृदयविकार, उच्च रक्तदाब, अल्सर, इ. त्रास होऊ शकतात. आपल्या सामाजिक व कौटुंबिक वर्तनात, सहकाऱ्यांशी व नातलगांशी वागण्यात, निर्णयप्रक्रियेत या तणावामुळे अडथळे निर्माण होऊ शकतात. संबंध ताणले जाऊ शकतात. त्यातूनही जीवनातला आनंदाचा भाग कोमेजून जाऊ शकतो. अशा परिस्थितीत आपण हताश वा निराश होऊन काहीच साध्य होत नाही. आपणच आपल्याला सावरले पाहिजे. आपले मनोबल वाढवले पाहिजे, आपले मानसिक संतुलन टिकवून धरले पाहिजे. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून समस्यांचे निराकरण केले पाहिजे. गॉड हेल्प्स देम दोज हू हेल्प देमसेल्व्हज्; जे स्वत:ला मदत करतात त्यांनाच देवही मदत करतो. देव त्यांच्या पाठीशी राहतो. जे स्वत:च हिंमत करतात, ते सर्व बाबतीत अपेशी ठरतात. धक्के खातात. स्वत:चे आरोग्य, स्वत:चे कुटुंब, स्वत:चे व्यवसायधंदे, स्वत:चे महात्म सर्व काही गमावून बसतात.

आपले असे काही होऊ नये; आपले जीवन सुखीसमाधानी व्हावे, अर्थपूर्ण व्हावे, सार्थकी



# आपल्या निश्चयाची सतत आठवण ठेवा व त्याप्रमाणे कृती करण्याचा प्रयत्न करा.

लागावे. निरामय निकोप आनंदी जीवनाचा आपल्याला लाभ व्हावा. आप्तमित्रात व व्यावसायिकात आपले आत्मीय स्थान असावे. अशीच भावना प्रत्येकाची असते. असायला हवी.

त्यासाठी आपण स्वत:ला अनेक चांगल्या गोष्टींची सवय लावायला हवी.

'चिंतामुक्त जीवन' या पुस्तकात अशीच काही सकारात्मक गोष्टींचे महत्त्व वाचकांच्या मनावर ठसविण्याचा प्रयोग केल गेला आहे. श्री श्री रविशंकर महाराज यांच्या सुदर्शन क्रियेने हजारो लोकांना जीवनाचा नवा अर्थ आणि आशय गवसला. मनाची मरगळ दूर होऊन कार्याची नवी दिशा लाभली. आयुष्यात जगण्यासारखे खूप काही आहे याचा प्रत्यय आला.

आपण आपल्या भावभावनांना जर सकारात्मक, आशावादी, सत्प्रवण वळण दिले तर आपल्या आयुष्यात आमूलाग्र परिवर्तन घडून येते. आपल्या भावभावना व मनोवृत्ती यांचा आपल्या मनाप्रमाणेच शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो. या भावपटलांचा डोकेदुखीपासून कॅन्सरपर्यंत सर्व प्रकारच्या दुखण्यावर सखोल प्रभाव पडतो हे सर्व समावेशक मानसशास्त्राचे समुपदेशक आता गृहीत धरूनच उपाययोजनेकडे वळतात.

'आपल्या मनोविकारांवर ताबा मिळवून त्यांना योग्य वळण लावले तरच जीवनाचा खरा आनंद निर्माण होतो. सुविचार, सद्भावना ही सुखमय आयुष्याची जीवनसत्त्वे होत. त्याचबरोबर एकमेकांशी दाट मैत्री असणे, परस्परांच्या सुख दु:खात सहभागी होणे, हीच आनंद जीवनाची गुरुकिल्ली आहे असे या पुस्तकाचे सूत्र आहे.'

या पुस्तकात एकूण १२ प्रकरणे असून त्यात ६७ विषयांवरचे भाष्य आहे. भावनिक कणखरता, आशावादी दृष्टिकोन, नकारात्मक भावनांचा निचरा, तणाव निर्माण करणारी कारणे, तणावपूर्ण जगात निरोगी राहणे, मानसिक प्रथमोपचार, सर्व सूत्रे हाती घेणे, स्वत:ची जाणीवेची पातळी उंचावणे, जे काम करायचे ते चांगलेच करा, भावनांचा वापर निरामय निकोप जीवनासाठी करणे, मन व शरीर यांचे नाते, मनौषधींचा साठा अशा बारा विभागात या पुस्तकाचे प्रतिपादन विभागलेले आहे. कुठलेही पान उघडून वाचू लागले तरी आपण या पुस्तकात गढून जातो, इतके नवेजुने विषय त्यात विखुरलेले आहेत. परंतु आरंभापासून सूत्रबद्ध वाचन केले तर हे आत्मबळ वाढवण्याचे तंत्र अधिक ठसठशीत आपल्या मनाचा ठाव घेऊ शकेल आणि आपणास योग्य दिशेने कार्यप्रवण करू शकेल.

### आपल्या कणखरपणाची स्वत:च चाचणी घ्या

आपण मानसिकदृष्ट्या किती कणखर आहोत याची चाचणी आपली आपणच घेऊ शकतो. त्या चाचणीवरून स्वत:चे मूल्यमापन करून योग्य त्या उपाययोजनेकडे वळू शकतो. तुम्ही ही चाचणी स्वत:च घेऊन बघा. सोपी आहे ती !

या चाचणीसाठी पुढील विधानांनी गुण द्या.

विधान पूर्णपणे अमान्य असेल तर ० शून्य गुण द्या





# स्वच्छंदी असणे म्हणजे जीवनात सौंदर्य शोधणे होय!

सौम्य विरोध असेल तर १ गुण

सौम्यपणे होकार असेल तर २ गुण

पूर्ण होकारार्थी उत्तम असेल तर ३ गुण.

१. कामामध्ये पूर्ण लक्ष दिल्याने फरक पडतो असे मला वाटते.
२. एखाद्या नातेसंबंधाबाबत मी नशिबावर हवाला ठेवतो.
३. सकाळी उठल्यावर दिवसभरातील कामे भरभर करण्यासाठी मी उत्सुक असतो.
४. स्वत: रिकामे आहोत या भावनेने खूप निराशा व अडचणी निर्माण होतात.
५. काही आव्हानात्मक काम समोर आले की मी आर्थिक व इतर अडचणींची पर्वा करीत नाही.
६. ठरलेला दिनक्रम बदलण्याची वेळ आली तर मी अस्वस्थ होतो.
७. एक सामान्य नागरिक राजकारणावर प्रभाव टाकू शकतो.
८. योग्य त्या संधीशिवाय माझ्या क्षेत्रात यशस्वी होणे अवघड ठरते.
९. मी जे काही करतो ते का करतो हे मला ठाऊक आहे.
१०. लोकांच्या जास्त संपर्कात येण्याने आपण त्यांचे काही देणे लागतो ही भावना निर्माण होते.
११. रोज नव्या समस्यांना तोंड देणे हा आपल्या आयुष्याचा अटळ भाग आहे.
१२. हातात काम नसले तरी मला चालते.

प्रत्येक विधानाला ० ते ३ गुण यापैकी एक तुम्ही द्या आणि त्या गुणांची बेरीज करा. बेरीज ५ आली तर तुमच्या कणखरपणाचा अभाव आहे; ९ पर्यंत बेरीज असेल तर तुमच्यात मध्यम प्रतीचा कणखरपणा आहे. १० ते १८ गुण मिळाले तर तुम्ही चांगल्या अर्थाने कणखर व खबीर आहात

कणखरपणा वाढवण्यासाठी मनाचे केंद्रीकरण, तणावपूर्ण परिस्थितीचे पुनरावलोक आणि स्वत:च्या वर्तनात सुधारणा करून त्रुटी दूर करणे या उपायांची गरज आहे. आव्हान स्वीकारायलाच हवे, पण त्यामागे दुराग्रहीपणा नसावा. हट्टीपणा नसावा.

### महत्त्वाची सूत्रे

या पुस्तकात अनेक महत्त्वाची सूत्रे आहेत.

- समाज म्हणजे सुरक्षा कवच.
- आपले मनोगत मोकळेपणाने व्यक्त करता येईल असे मित्र असले तर तुम्हाला तणावातून मुक्त होणे सोपे जाईल.
- चांगले मित्र आणि जोडीदार म्हणजे जीवनप्रवाह शांत व संथ चालण्याचे दैवी वरदानच होय.
- एरोबिक व्यायामाद्वारे मनाचा खंबीरपणा वाढतो. उत्साह व तरतरी येते, तणाव झेलण्याची क्षमता वाढते. ताण, चिंता, आक्रमकता, भांडखोरवृत्ती, थकवा, उदासीनता कमी होते. मन स्वच्छ होते. एकाग्रता वाढते. आत्मविश्वास, आशावादी वृत्ती वाढते. झोप चांगली लागते. प्रकृती



## आपणाला हवे ते करण्यात मग्न राहणे म्हणजे सर्जनशीलता.

सुदृढ होते.

- प्रेम करा, प्रिय व्हा आणि देत राहा.
- रडणे आणि कण्हणे या नैसर्गिक सुरक्षा झडपा
- एकटे राहा पण एकलकोंडे बनू नका.
- अनिश्चितता - सर्वांचा एक नंबरचा शत्रू
- तुमचा खतरनाक शत्रू तुम्हीच.
- प्रकाशामुळे शरीराची प्रतिकारशक्ती वाढते.
- प्रत्येकाला किती खाजगी जागा लागते हे त्या व्यक्तीच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते.
- सक्ती ते मुक्ती व व्यसनाचे मूळ शोधा.
- आंतरिक शांती म्हणजे आरोग्य. बरे करणे म्हणजे भीती दूर करणे.
- कामापेक्षा जीवनाचा आनंद महत्त्वाचा.
- आपणाला हवे ते करण्यात मग्न राहणे म्हणजे सर्जनशीलता.
- स्वत:ची जाणीव उंचावण्याने जीवनाचा आनंद वाढतो.
- सुखाची गुरूकिल्ली - क्षमा - दुसऱ्याने केलेल्या अपराधासाठी त्याला क्षमा कराच; पण स्वत:लाही क्षमा करा. त्याच्याबद्दल रागभावना धरल्याबद्दल
- स्वत:ला ओळखण्याचेही एक तंत्र आहे.
- मर्यादित धोका पत्करण्याची हातोटी हवी.
- भीतीची भावना आपल्या आरोग्याला अपकारक ठरते.
- दुसऱ्यांना मदत करणारे स्वत:ला बरे करतात.
- प्रेम आणि आरोग्य हे हातात हात घालून असतात.
- जो हसतो तो टिकतो. हसणाऱ्या माणसांची संगत धरा.

### प्रश्न सोडवण्याचे तंत्र

या पुस्तकात काही अभिनव तंत्रमंत्रांचाही परामर्श घेतला आहे. उदा. कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी कोणते तंत्र उपयक्त ठरू शकते ? सध्याची नोकरी तुम्हाला आशादायक वाटत नसेल, ती बदलायची इच्छा असेल तर काय करायला हवे ?

१. कल्पनेची भरारी मारा. डोळे मिटा. जास्तीत जास्त काय वाईट होईल याचा विचार करा.

२. पहिला दिवस - ऑफिस कामाचा ढीग. रागावलेले साहेब. तुमचे लक्ष कामात लागत नाही. मन उदास.

दुसरा दिवस - नोकरीवरून काढून टाकण्याची ऑर्डर टेबलावर दिसते.

तिसरा दिवस - टोकाला जाऊन विचार करा. आहे त्या नोकरीत आणखी काही वर्षे





## अंतरीची ज्योत तेवत ठेवण्यासाठी भावना, प्रवृत्ती आणि वर्तणूक हे महत्त्वाचे घटक आहेत.

काढणे जरूर. मग आव्हान स्वीकार. जास्त वाईट काय ? नव्या नोकरीतील अनिश्चितता की पुन्हा नोकरीतील सुरक्षितता ? शांतता..

अशा दिवास्वप्नातून स्वत:ला अधिक अनुकूल मार्ग निवडण्याला मदत होऊ शकेल. (१४४)

स्वत:ला ओळखण्यासाठी स्वप्नांचा उपयोग होऊ शकतो. स्वप्नातून संदेश मिळतो. त्यासाठी झोपण्यापूर्वी मनाला सूचना द्या. स्वप्न आठवण्याची प्रक्रिया त्यामुळे सुरू होईल. स्वप्न आठवणीत असेल तोपर्यंत लिहून ठेवा. स्वप्नाला शब्दरूप दिल्याने आपल्या कार्यक्षमतेत भर पडते.

फार काम करणे म्हणजे सुखी होणे. हा समजही बरोबर नाही. दबावाखंली काम करणारे लोक कार्यदक्ष असूनही सुखी असतात असे नाही. विश्रांती म्हणजे स्वातंत्र, विचारशीलता आणि निवड. पण त्यासाठी वेगळी रचना जरूर नसते. हे मोकळेपणाचा अर्थ आहे कामातून सुटका आणि विशाल दृष्टिकोनातून केली गेलेली आवड. भारदस्त व्यक्तिमत्त्व असणाऱ्याला अशी मोकळीक साधणे अवघड जाते. (१३०-१)

झोपेची गुणवत्ता वाढवल्याने दिवसभरातील आपली कार्यक्षमता वाढते. झोपेची गुणवत्ता वाढविण्यासाठी या पुस्तकात १९ मार्ग देण्यात आले आहेत. (१०४-६)

विश्रांती, रजा, सुटी यांचीही आपल्या कार्यक्षमतेसाठी गरज असते. सुटी का घ्यावी याचीही १५ कारणे या पुस्तकात देण्यात आली आहेत. (रिलॅक्सेशन, मैत्री, शिक्षण, साहस, सरप्राईझ, सौंदर्य, अपेक्षा, स्मृतिरंजन, स्वातंत्र्य, सेल्फ डिस्कव्हरी, आनंद इ.)

स्वीडिश व शियात्सु मसाज पद्धतींमुळे रक्ताभिसरण वाढते. स्नायूंवरचा ताण कमी होतो आणि आपण ताजेतवाने होतो. (८१-८४)


आपण स्वत:ला शारीरिक व मानसिकदृष्ट्या सतत ताजेतवाने ठेवायला हवे, म्हणजेच स्वत:चे सतत नूतनीकरण करीत राहायला हवे. हे कसे जमू शकेल याचे काही मार्ग पृष्ठ ७६-७७ वर सुचवले आहेत.

सुखी कुटुंबात प्रेम, परस्पर कौतुक-आदरभाव, मोकळेपणाने संवाद परस्परसहवासाची ओढ, खंबीर नेतृत्त्व ही लक्षणे आढळतात. (४८). सदिच्छा, सद्विचार, प्रश्न सोडवण्याची इच्छा व कुशलता यांचीही गरज असते. (५०)

प्रेम, सांत्वन, स्पर्श, आलिंगन, क्रीडा, पाळीव प्राणी, संगीत, विनोद, कौटुंबिक स्नेहसंमेलने, घराची रंगसंगती, नैसर्गिक प्रकाश- वगैरे गोष्टी म्हणजे मनौषधी होत असेही प्रतिपादन या पुस्तकात आले आहे.

एकूणच आपल्या मनोवृत्तींना ताजे तरतरीत करणारे हे पुस्तक आहे.

**पृष्ठे : २२४ किंमत : १६० रु. सभासदांना : १२० रु. पोस्टेज : २० रु.**




# द ब्रेडविनर

**मूळ लेखिका : डेबोरा एलीस**
**अनुवाद : अपर्णा वेलणकर**


**तालिबानी राजवटीतील क्रौर्य, हिंसा आणि अत्याचार यांची झलक दाखवणारी कादंबरी**

अफगाणिस्तानमध्ये तालिबान राजवट आली आणि तेथील जनजीवनात मूलतत्त्ववादी अतिरेक्यांनी धूमाकूळ घालण्यास आरंभ केला. इस्लामच्या 'आदिम' कायदेकानूंचा आधार घेऊन या सनातनी सत्ताधीशांनी स्त्रियांवर कडक निर्बंध लादले. शिक्षण घेण्यास मज्जाव, गोषाची सक्ती, एकट्या दुकट्या स्त्रीने रस्त्यावर येण्यास मनाई, पुरूष बरोबर असल्याविना घराबाहेर पडण्यास बंदी, अर्थार्जनाला बंदी, याद्वारे पुरुषी वर्चस्वाची द्वाही फिरवली जाऊन, तालिबानी राजवटीने धर्माच्या नावाखली दडपशाहीचे, लुटालुटीचे, शोषणाचे अमानुष सत्र सुरू केले.

अशी एखादी राजवट येते तेव्हा कुटुंबजीवन कसे उद्ध्वस्त होते, साध्या साध्या गोष्टीसाठीही कशी जीवनाची बाजी लावावी लागते,आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जगताना मानवी नात्यांचीही कशी गळचेपी होते - याची कल्पना आपल्या सारख्या सुरक्षित कोशात राहणाऱ्या आणि लोकशाहीत जगणाऱ्या व्यक्तींना येणे कठीण असते. जंगलचा कायदा लागू झाला की बळी तो कान पिळी हाच जीवनमंत्र ठरतो; आणि सत्तेपुढे शहाणपण चालत नाही याचा पदोपदी अनुभव येत राहतो.

'दि ब्रेडविनर' ही उण्यापुऱ्या सव्वाशे पृष्ठांची कादंबरी अफगाणिस्तानमध्ये तालिबानी राजवट आल्यावर तेथील जनजीवनात झालेल्या परिवर्तनाची झलक पेशं करते. डेबोरा एलीस या कॅनडामधील लेखिकेने १९९९ मध्ये अफगाण निर्वासितांसाठी रशिया आणि पाकिस्तान या देशांत उभारलेल्या मदत केंद्रांमध्ये स्वयंसेविका म्हणून काही काळ काम केले. त्यावेळी तिला जे दिसले, त्यावर तिने 'दि ब्रेडविनर' या कादंबरीच्या द्वारे तिने प्रकाशाचा एक झोत टाकला आहे. ही कादंबरी इ.स.२००० च्या हिवाळ्यात प्रसिद्ध झाली. पाश्चात्य देशात ती बेस्ट सेलर म्हणून घरोघरी गेली. कॅनडामधील रेड मेपल रीडिंग ॲवार्ड या प्रतिष्ठेच्या राष्ट्रीय पुरस्कारासाठी तिचे नामांकन झाले. या पुस्तकाच्या मानधनापोटी मिळणारी रक्कम पाकिस्तानातील निर्वासित छावण्यात राहणाऱ्या अफगाण





## वर्षानुवर्षे युद्धानं कंबरडं मोडलेल्या एका उजाड, बेचिराख देशाची उध्वस्त कहाणी...

मुलींच्या शिक्षणासाठी ती खर्च करते.

दि बेडविनर या छोटेखानी कादंबरीची नायिका एक बारा तेरा वर्षाची परवाना ही मुलगी आहे.


तालिबानांनी अफगाणिस्तानवर कब्जा मिळवल्यावर सगळ्या बायकांना घरात बंदिस्त करून टाकले. छोट्या मुलींना शाळांतून हाकलून घरी बसवले. नोकरी करणाऱ्या स्त्रियांना घराबाहेर बुरखा घातल्याशिवाय पडण्यास मज्जाव केला. पुरूष माणूस बरोबर असले तरच स्त्रियांना रस्त्यावरून चालता येईल; तोंड उघडे ठेवले तर ॲसिड टाकून त्यांचा चेहरा विद्रूप केला जाई. लाथा बुक्क्यांनी सैनिक त्यांना तुडवत. गोळ्या घालत. त्यांच्यावर अत्याचार करीत. स्त्रियांना दुकानात जाण्याची परवानगी नव्हती.

तालिबानी हे खरे तर मूळचे अफगाणच. परंतु देशाच्या राज्यकारभाराबद्दल त्यांच्या विकृत व चमत्कारिक कल्पना होत्या. तालिबान म्हणजे धर्माचरणाचं आचरण करणारा विद्यार्थी. परंतु त्याऐवजी तालिबानी धर्माचा धाक दाखवून माणुसकीला काळिमा फासत होते. लोकांवर अत्याचार करीत होते. परस्परांबद्दल द्वेष पसरवत होते. सर्व पुरूषांवर दाढी वाढवण्याची सक्ती करण्यात आली होती. रेडिओ - दूरचित्रवाणीवरचे कार्यक्रम बंद करण्यात आले. करमणुकीची केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली. शिक्षणसंस्थांना कुलपे लावण्यात आली. जवळ पुस्तक बाळगणे म्हणजे सैनिकांचा रोष ओढवून घेणे. वेळेवर हजारो लोकांना तालिबानांनी तुरुंगात डांबले होते.

काबूल हे एके काळचे सुंदर शहर. परंतु दीर्घकाळ चाललेल्या बाँबहल्ल्यांनी ते पार उद्ध्वस्त झालेले होते. बहुसंख्य घरांची कमी जास्त पडझड झालेली होती. भिंतींना तडे गेले होते. जिने डगमगत होते. छपरांना भगदाडे पडलेली होती. बाजार ओस पडले होते. लोक आपल्याकडील जुन्या पुराण्या वस्तू रस्त्यावर मांडून विकत असत. गरजू लोक त्या विकत घेत. दुकानात खरेदीसाठी जाण्याची मुभा नसल्याने गोषातल्या बायका दुकानाबाहेर उभ्या राहून ओरडून जिन्नस मागत. दुकानात स्त्रियांना प्रवेश दिला तर सैनिक त्या दुकानदारांना बेदम मारत. दुकानातला माल बाहेर फेकून देत.

पाणीपुरवठ्याची व्यवस्थाही पार बिघडली होती. ठराविक वेळी नळाला पाणी येई. ते भरण्यासाठी बायकांना गोषा घालूनच जावे लागे. डगमगत्या जिन्यावरून पाणी घेऊन जाताना अनेक गोषातल्या बायका खाली पडत. जखमी होत.

परवानाचे घराणे खानदानी रईस वडील एकेकाळचे इंग्लंड रिटर्न्ड प्राध्यापक परवानाची आईही विद्यापीठाची पदवीधर. चांगले घर. सुर्व सुखसोयी. नोकरचाकर. टीव्ही, फ्रीज, कार. परवाना आणि तिची धाकटी बहीण मरियम यांच्यासाठी स्वतंत्र खोली. मोठी बहीण नुरिया..पण एके दिवशी त्यांच्या त्या आरेसचारेस घरावर बाँब पडतो आणि सर्व काही नव्या घरी गेले की तिथेही बाँब फेक. पुन्हा पळापळ..मग नवे घर... शेवटी एक घाणेरडी कोंदट खोली त्यांच्या वाट्याला आली. आणि जगण्याची उमेदच कमी झाली. वीस वर्षे सतत चाललेल्या युद्धाच्या धूमश्चक्रीत सगळे काही




## सुन्न करून टाकणारं क्रूर पशुत्व... आणि रक्तामांसांच्या चिखलातसुद्धा मुळं धरणारी निखळ माणुसकी...

विस्कटून गेले. आगीचे लोळ... भुकेचं थैमान आणि वाताहत.

परवानाचे वडील उच्चशिक्षित. परंतु त्यांच्यावर भर बाजारात धुळीत बसून लोकांची पत्रे लिहून देऊन गुजराण करण्याची पाळी येते. अफगाणिस्तानमध्ये एकूणच बहुसंख्य लोक अशिक्षित. पुरूषवेषात गळ्यात खोके अडकवून सुकामेवा, बिस्किटे, गोळ्या वगैरे विकतात...कबरस्तानातील थडग्यांमधील हाडे उकरून ती हाडे किलोवर विकातात...

स्टेडियमवर एकदा तालिबानी सत्ताधीश सहा कैद्यांचा चोरीच्या आरोपावरून तलवारीने ऐक हात कापतात. परवाना आणि तिची मैत्रीण शौझिया ते दृश्य पाहून पार हबकतात. एक वृद्ध गृहस्थ त्यांना धीर देतो. ''मोठे झालात हेच जन्मभर बघायचय तुम्हाला..अल्लाच्या दयेनं अजून लाहन आहात तुम्ही.'' असे तो म्हणतो. दर शुक्रवारी असा जाहीर शिक्षा देण्याचा कार्यक्रम होतो..

परवानाची मोठी बहीण नुरिया हिची शादी ठरते. ती मझार या ठिकाणी अम्मीबरोबर शादीसाठी जाते. पण त्या शहरावरही तालिबानी कब्जा करतात असे कळते तेव्हा परवानाला धक्का बसतो..

एक दिवस अचानक अब्बू घरी येतात, आणि घरातले वातावरण बदलते. परवाना आणि अब्बू मझार शरीफला जाण्यासाठी एक ट्रक गाठतात. निरोप घेताना शौझिया परवानाला म्हणते, ''आज पासून बरोबर वीस वर्षांनी आपण भेटू...पॅरिसमधल्या आयफेल टॉवरच्या सर्वात वरच्या मजल्यावर...''

परवानाच्या या कहाणीतून अफगाणिस्तानातील तालिबानी राजवटीची थोडीफार कल्पना येते. तालिबानांनी केलेल्या विध्वंसाची माहिती मिळते. गुप्तपणे त्या राजवटीबद्दलचा आपला असंतोष प्रकट करणाऱ्यांच्या प्रयत्नांची दिशाही कळते.

**पृष्ठे : १४० किंमत : १०० रु. सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**

# निवेदन


### बालसाहित्यकार परिचय कोश

बालकुमार साहित्य संमेलन संस्थेतर्फे महाराष्ट्रातील बालकुमार-साहित्यकारांचा परिचय कोश तयार करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्यासाठी ज्यांची बालसाहित्याची किमान पाच पुस्तके प्रकाशित झालेली आहेत अशा लेखकांनी पुढील माहिती पाठवावी.

१. पूर्ण नाव, २. पत्ता- फोन, ३. जन्मस्थळ, ४. जन्मतारीख, ५. शिक्षण, ६. प्रकाशित पुस्तकांची नावे - विषय, पृष्ठे, किंमत, प्रकाशक या तपशीलासह, ७. मिळालेले पुरस्कार - मानसन्मान, ८. सध्याचा व्यवसाय, ९. आगामी पुस्तकांची नावे व स्वरूप. या माहितीबरोबर स्वत:चा फोटोही पाठवावा.

**संपर्क पत्ता** - बालसाहित्यकार परिचय कोश, द्वारा शंकर सारडा, २० विशालश्री, ४५९ नारायण पेठ, पुणे ४११ ०३०, फोन - (०२०) ४४९००८३.






# द पेलिकन ब्रीफ


**मूळ लेखक : जॉन ग्रिशॅम**

**अनुवाद : रवींद्र गुर्जर**

**अमेरिकेच्या राजकारणावर आणि न्यायव्यवस्थेवर महत्त्वाकांक्षी स्वार्थी धनिकांचा प्रचंड प्रभाव**

जॉन ग्रिशॅम या बेस्टसेलर लेखकाची दि पेलिकन ब्रीफ ही तिसरी कादंबरी. १९९२ मध्ये ती प्रथम प्रसिद्ध झाली. वाचकांना स्तिमित करणाऱ्या या चित्तथरारक कादंबरीवर चित्रपटही निघाला; आणि तोही गाजला. वॉटरगेट सारखेच एक अमेरिका हादरवून टाकणारे प्रकरण या कादंबरी द्वारे वाचकांपुढे खुले होते.

या कादंबरीचे कथानक 'दि पेलिकन ब्रीफ' भोवती गुंफलेले आहे. अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाच्या दोन न्यायाधीशांची हत्या होते; त्या हत्येमागे कोणाचा हात असावा याबद्दलचे एक टिपण डार्बी शॉ ही तरूणी तयार करते. ती लॉ कॉलेजमध्ये वकिलीचा अभ्यास करीत असते; आणि थॉमस कॅलहान या घटनातज्ज्ञ प्राध्यापकाची ती आवडती विद्यार्थिनी असते. समकालीन खटल्यांची उदाहरणे घेऊन आपल्या विद्यार्थ्यांचा त्यामधील कायद्याच्या गुंतागुंतीच्या बाबी समजावून देण्यात थॉमस कॅलहानचा हातखंडा असतो; आणि डार्बी शॉ त्याच्या प्रेमात पडलेली असते. ज्या दोन न्यायाधीशांची हत्या झालेली असते, त्यांनी गेल्या काही वर्षात दिलेले निर्णय विशिष्ट वर्गाला प्रोत्साहन व संरक्षण देणारे असतात. पर्यावरणवादी, समलिंग संबंधवादी, इंडियन्स, कृष्णवर्णीय, स्त्रीवादी, वृक्षप्रेमी, गर्भपातविरोधी, निरीसरवादी, अपंग इत्यादी वर्गांची बाजू उचलून धरणाऱ्या निकालांमुळे काही गट या न्यायाधीशांवर नाराज असतात. अमेरिकन घटने नुसार सुप्रीम कोर्टाचे नऊ न्यायाधीशांवर नाराज असतात. अमेरिकन घटनेनुसार सुप्रीम कोर्टाचे नऊ न्यायाधीश हे नेमणुकीनंतर तहह्यात असतात; एखाद्याचा मृत्यू झाला तरच त्याच्या जागी दुसऱ्या न्यायाधीशाची नेमणूक होते. खून झालेल्या दोघा न्यायमूर्तींपैकी रोझेन बर्ग हा तर नव्वदी पार केलेला असतो; आणि दुसरा न्यायाधीश जेसन हा कधी पुरोगामी तर कधी प्रतिगामी भूमिका घेत असल्याने बेभरवशाचा मानला जातो. वादग्रस्त निर्णयामुळे न्यायाधीशांना सतत खुनाच्या धमक्या येत असतात आणि त्यांना सतत सुरक्षा अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली राहावे लागते. तरीही जोसन हा



# इंग्रजी बेस्ट सेलर जॉन ग्रिशॅम मराठीत प्रथमच... लोकप्रिय अनुवादक रवींद्र गुर्जर यांच्या शब्दातून...

सुरक्षा अधिकाऱ्यांना गुंगारा देऊन रात्री करमणुकीसाठी कुठे ना कुठे जात असतो. रोझेन बर्गचा खून त्याच्या घरातच तो झोपलेला असताना होतो; आणि सत्तरवर्षाच्या जेसनचा खून एका भिकार क्लबमध्ये एक सवंग चित्रपट पाहताना होतो. हत्या करणारा मारेकरी हा व्यावसायिक असतो कसलाही पुरावा तो मागे ठेवत नाही.

अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला त्या दोघांच्या खुनाची चौकशी करण्यासाठी तसेच त्यांच्या जागी नव्या न्यायाधीशांची नेमणूक करण्यासाठी सूत्रे हलवावी लागतात. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशाचा खून होण्याची घटना अमेरिकेत प्रथमच घडलेली असते. त्यामुळे सर्वत्र खळबळ माजणार हे उघडच असते.


डार्बी शॉ आणि थॉमस कॅलनहान हे साहजिकच या दोन खुनांबद्दल चर्चा करतात; आणि संभाव्य खुनी कोण असेल या बद्दलचे तर्क एकमेकांना ऐकवतात. डार्बी शॉ कॉलेज लायब्ररीत असून रोझेनबर्गने दिलेल्या निकालांवरून संभाव्य संशयितांची यादी तयार करते. पण ती यादी कुचकामी आहे असे तिलाच समजून येते. कारण त्या यादीतली नावे सर्वांनाच ठाऊक असतात. तरीही ती आपली हेरगिरी चालूच ठेवते. चार दिवस त्या प्रकरणाचा पिच्छा पुरवते.

संगणकावर त्याबद्दलचे अहवालवजा टिपण करून , संभाव्य खुनी माणसाबद्दलचा आपला तर्क ती समर्पक युक्तिवादासह मांडते. या तेरा पानांच्या टिपणाची एक प्रत कॅलनहान वाचण्यासाठी घेतो व ती प्रत तो सरकारी वकील गेविन वेरहीक या आपल्या मित्राला चाळण्यासाठी देतो. गेविन हा मुख्य न्यायाधीशाच्या विश्वासातला असतो. तो ते ब्रीफ वाचतो. संशयिताचे तिने सुचवलेले नाव त्याने कधी ऐकलेले नसते. तो ते ब्रीफ एरिक ईस्ट या एफबीआय मधल्या अधिकाऱ्यांकडे पाठवतो. त्या ब्रीफमध्ये अध्यक्षांचा उल्लेख असल्याने एरिक ते ब्रीफ अध्यक्षांचा वैयक्तिक सहाय्यक कोल याच्याकडे पाठवतो. कोल लगेच अध्यक्षांना त्या ब्रीफची माहिती देतो. त्याचे टिपणाचे नामकरण मग दि पेलिकन ब्रीफ असे होते. कोल अध्यक्षांना सांगतो, ''एफबीआयचा वॉयल्स आणि त्याचे बगलबच्चे यांना योगायोगानं एक संशयित आढळला आहे. आतापर्यंत कोणी त्याचा उल्लेख केला नव्हता. एक अत्यंत गूढ आणि अशक्य कोटीतील संशयित. 'तुलने' येथील लॉ कॉलेजच्या एका अतिउत्साही हायद्याच्या विद्यार्थिनीनं ही भिकार गोष्ट लिहिली आहे. कशीतरी प्रवास करत ती वॉयल्सपर्यंत गेली. त्यानं मोठ्या उत्साहानं खुनी माणसाचा तपास लावायचं ठरवलं आहे. शिवाय प्रेस त्याच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवून आहे.''

तुम्ही सीआयएला ताबडतोब याचा तपास करायला सांगा. वॉयल्स ने खणायला सुरुवात करण्यापूर्वी आपल्याला त्याची सगळी माहिती मिळायला हवी. हे घरगुती प्रकरण आहे. सीआयएने त्यात ढवळाढवळ करू नये. ते बहुतेक बेकायदेशीरपण आहे. असेही तो सांगतो. ''आपल्या ओळखीचं त्यात कुणी आहे का ?'' या अध्यक्षांच्या प्रश्नावर कोलचे उत्तर होकारार्थी असते.

...त्याच वेळी वॉशिंग्टन पोस्टच्या ग्रे ग्रँथॅम या वार्ताहराला एक फोन येतो, ''मी काल तुमची





# बेस्ट सेलर लेखकाची बेस्ट सेलर थरार कथा

बातमी वाचली. व्हाइट हाऊस आणि उमेदवारांबद्दल ... मी फार घाबरलेला आणि गोंधळलेला आहे. त्या न्यायाधीशांना कोणी ठार केलं हे मला ठाऊक आहे. पण ते उघड केले तर माझा खून होऊ शकेल. माझा कोणीतरी पाठलाग करीत आहेत. मी एक वकील आहे. माझं नाव गार्सिया.. मी जर तुम्हाला काही सांगितलं तर तुम्ही काय कराल ?...मी नंतर फोन करीन.'' ग्रे त्याला आश्वासन देतो, ''मी तुमच्या सांगण्याप्रमाणे पूर्ण शोध घेईन. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशाच्या खुनांबद्दल आपण कोणावर आरोप करणार असलो तर ती बातमी फार नाजूकपणे हाताळावी लागेल.''

पण ग्रेला काही सांगण्याआधीच गार्सियाचीही हत्या होऊन जाते.

आणि त्यानंतर कॅलहान व डार्बी शा रात्री जेवून हॉटेलमधून बाहेर पडतात. पार्किंग लॉटमधून कार बाहेर काढत असताना एकदम स्फोट होऊन कॅलहान मरण पावतो. डार्बी दूर उभी असल्याने वाचते... त्याचवेळी दोन पोलिस तिच्याजवळ येऊन तिला आपल्या गाडीत बसवून तिचं नाव विचारतात...तेवढ्यात पोलिसांची दुसरी गाडी येते आणि आपली कार तेथेच सोडून ते दोघे पोलिस पळ काढतात.खरे पोलिस त्या गाडीबद्दल डार्बीकडे चौकशी करतात...ते बनावट पोलिस कोण असतात ?


डार्बीला कळून चुकते - आपण नशिबाने वाचलो. ती गेविनला फोन करून आपल्या ब्रीफबद्दल विचारते. ते कोणी कोणी वाचले याची चौकशी करते. एफबीआयच्या बाहेर ते कोणी वाचलेय का या तिच्या प्रश्नावर तो अस्वस्थ होतो. कारमध्ये आमच्या दोघांसाठी बॉंब ठेवला होता. पण मी वाचले. आताही माझ्या पाठलागावर कोणीतरी आहे...''

गेविन तिला सांगतो,''तू धोकादायक परिस्थितीत आहेस.. काळजी घे.'' गेविन त्या ब्रीफ बद्दल एफबीआयच्या डायरेक्टरशी बोलतो. पण डायरेक्टर ते ब्रीफ विसरून जा असे म्हणून त्याला कटवतो. तेव्हा डार्बी फोनवरुन त्याला म्हणते, '' तुम्हाला ब्रीफ दिले, आणि ते कुठे कुठे गेले. ४८ तासाच्या आत आम्हाला मारण्याचा प्रयत्न झाला. म्हणजे हत्या ब्रीफमुळे झाली; जर तसे असेल तर थॉमसचा खुनी कोण आहे हे आपल्याला माहीत आहे. आता न्यायमूर्तींना कोणी मारले हेही आपल्याला ठाऊक होईल. बरोबर ?''...

पहिल्या सव्वाशे पृष्ठत हे कथानक इथवर येते. आणि पुढे ते वेगवेगळ्या पातळ्यांवर वेगाने दौडत राहते. पुढचे काम त्या संशयित खुन्यापर्यंत पोचणे आणि पुराव्यासह ते प्रकरण उघडकीस आणते हे उरते. पण हे काम सोपे नसते. त्याला अनेकविध फाटे फुटलेले असतात.

**एक -** डार्बी शॉ आपला पाठलाग होत असल्याचे बघून स्वत:ला वाचवण्यासाठी वेषांतर करून सारख्या जागा बदलत राहते. एफबीआय हे प्रकरण दडपू पाहतेय हे लक्षात आल्यावर आधी गेविनच्या व नंतर पत्रकार ग्रेच्या मदतीने खुनाचा तपास करण्याची कामगिरी स्वत:कडे घेते. सतत पाठलाग होत असूनही मारेकऱ्यांना हुलकावणी देण्यात ती यशस्वी ठरते.

**दोन -** खळबळजनक बातमी, मिळूनही, वादातीत पुरावा हाती असल्याशिवाय ती प्रसिद्ध



## सुप्रीम कोर्टाच्या दोन न्यायाधीशांचा खून होतो, आणि नव्या न्यायाधीशांच्या नेमणुकीची प्रक्रिया सुरू होते, तेव्हा एक लॉची विद्यार्थिनी त्या खुनांचे धागेदोरे शोधत राहते

करायची नाही हे पथ्य जबाबदार वृत्तपत्रे पाळतात. हा वादातीत पुरावा वॉशिंग्टन पोस्टच्या हाती आल्यावर ही बातमी प्रसिद्ध करताना राष्ट्राध्यक्षांसह संबंधितांच्या प्रतिक्रियाही घेण्याची दक्षता घेतली जाते... ते वृत्तपत्राच्या कचेरीतले नाट्य या कादंबरीत आपल्यापुढे समर्थपणे येते. प्रतिस्पर्धी वृत्तपत्रांच्या हाती काय लागले आहे याचेही दडपण सतत संबंधितांवर असते.

**तीन -** प्रचंड व्यावसायिक आणि आर्थिक सत्ता काबीज करणारे लोक कुठल्याही मार्गाचा अवलंब करून, भाडोत्री मारेकरी आणि गुंड यांचा वापर करून, आपले हितसंबंध जपण्याचा प्रयत्न करतात. राष्ट्राध्यक्ष, न्यायाधीश, संसद सदस्य, पोलिस यंत्रणा या सर्वांना ते मिंधे करून आपले वर्चस्व गाजवत राहतात. पर्यावरण, मानवी हक्क वगैरे गोष्टींची पर्वा त्यांना नसते. त्यांचे हात दूरवर पोचलेले असतात. देशोदेशी त्यांचे हस्तक विखुरलेले असतात आणि त्यांची कामे बिनबोभाट चालू असतात. राष्ट्राध्यक्षाच्या निवडणूक निधीला चाळीस लाख डॉलर्स देणगी देणाऱ्या उद्योगपतीला संरक्षण देण्याचा प्रयत्न राष्ट्राध्यक्ष करणारच !


**चार -** शासनयंत्रणेतही विविध अधिकारी आणि विभाग यांच्यात सुप्त वा उघड स्पर्धा चालू असते. परस्परांना शह देणे ही चालू असते. कर्तव्य आणि देशहित याबाबत वेगवेगळ्या संकल्पना असतात. दुर्जन आणि सज्जन यांचा संघर्ष चालू असतो. पण कुठेतरी मानवी न्यायबुद्धी आणि शहाणपण यांची सरशी होते खरी !

**पाच -** गुप्तहेर यंत्रणा, सीआयए, एफबीआय, मोठ्या सॉलिसिटर्सच्या फर्म्स - यांचे कामकाज अत्यंत कार्यक्षम पद्धतीने चालते. त्यांचे नेटवर्क सर्वदूर पसरलेले असते. तपशील मिळवण्याचे त्यांचे मार्ग, त्यातील गोपनीयता, वृत्तपत्रांना दूर ठेवण्याच्या त्यांच्या क्लृप्त्या यांचेही एक शास्त्र विकसित झालेले आहे.

जॉन ग्रिशॅम हा स्वत: एका वकिली फर्ममध्ये काम करीत होता आणि मिसिसिपीच्या विधानसभेचाही सदस्य होता. त्यामुळे कायद्यातील पळवाटा, न्यायालयांची कार्यपद्धती, शासनयंत्रणेचे व विधानसभांचे कामकाज, वकिली फर्म्समधील व्यवहारांचे स्वरूप यांचे तपशील त्याच्या कादंबऱ्यांमध्ये अचूक येणे हे स्वाभाविकच आहे. सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांच्या नेमणूका तहहयात असल्याने वाढत्या उतार वयात काही न्यायाधीश लोकेषणा व प्रसिद्धी यामागे लागून निकाल देण्याच्या मोहात पडतात; त्यातून अनेक दुष्प्रवृत्तींना खतपाणी मिळते. रोझेनबर्ग हा अशा न्यायाधीशांचा प्रतिनिधी आहे; आणि ग्रिशॅमला त्याच्याबद्दल काहीसा तिटकाराच आहे. या न्यायमूर्तींच्या शहाणपणावर किंवा न्यायबुद्धीवर त्याचा विश्वास नाही. न्यायदानही त्यांच्या लहरीपणावर चालते आणि न्यायाधीशांची निवड करताना त्याच्या विचारसरणीचा व पूर्ववृत्तान्ताचा विचार राष्ट्राध्यक्ष करतात. या सर्व गोष्टींवर जॉन ग्रिशॅम प्रकाश टाकतो. रोझेन बर्ग आणि जेसन यांच्यासारखे न्यायाधीश असल्यावर शासन व्यवस्था, घटना आणि न्याय यांची कशी गळचेपी होऊ शकते हे ही तो सूचित करतो.

'ए पेलिकन ब्रीफ' मधील घटनांचा कालावधी साधारण एक महिन्याचा आहे; आणि त्यात





## त्या मुलीने तयार केलेले टिपण म्हणजे पेलिकन ब्रीफ राष्ट्राध्यक्षांची आणि सी आय एफ बी आयची झोप उडवणारे का ठरते ?

अमेरिकेतील विविध यंत्रणांचा सहभाग आहे. राष्ट्राध्यक्षाचे कार्यालय, सुप्रीम कोर्ट, एफबीआय, सीआयए, सॉलिसिटर फर्म्स, लॉ कॉलेजेस, वॉशिंग्टन पोस्टसारखे वृत्तपत्रे, टीव्ही चॅनेल्स, क्रेडीट कार्ड व फोन यामुळे कुणाचाही माग लावण्याची सुलभ सुविधा, विमानतळावरील कामकाजाची पद्धत, पर्यावरणवादी, दहशतवादी संघटना, भाडोत्री मारेकरी, गुप्तहेरांचे जाळे पन्नाससाठ व्यक्तिरेखांद्वारे हे सर्व समावेशक कथानक सतत उत्कंठा वाढेल अशा प्रकारे गुंफण्यातील ग्रिशॅमचे कौशल्य वाखाणण्याजोगे आहे.

आजच्या या प्रगत तंत्रज्ञानाच्या व माहिती युगाच्या झपाट्यात साध्या साध्या गोष्टींमागेही किती गुंतागुंतीच्या यंत्रणेचे हितसंबंध दडलेले असतात - याचे थोडेफार दर्शन या कादंबरीत घडते; आणि ते आपल्या पायाखालची जमीन हिरावून घेण्याला पुरेसे ठरते.

**पृष्ठे : ३७२ किंमत : २८० रु. सभासदांना : २१० रु. पोस्टेज : २५ रु.**

**उत्तरे पाठवण्याची मुदत**
**१५ जानेवारी २००३**

## नवी स्पर्धा

खालील चौकोनात काही पुस्तकांची नावे दडलेली आहेत. पुस्तकांची नावे ओळखा व ती नावे लेखकाच्या नावासहित लिहून पाठवा व बक्षीस मिळवा

१. □ □ट □ लॉ□ □री □र्ट लेखक - □□ आ□र
अनुवाद - लीना सोहोनी

२. □हा□ता लेखिका - सु□ मु□ अनुवाद - उमा कुलकर्णी

३. □ □□र □ड लेखक - □लि□ □□स्
अनुवाद - अंजनी नरवणे

४. द □□ □फ □ल थिं□ लेखिका - □□ध□ □य
अनुवाद - अपर्णा वेलणकर

५. □□सि□ पा□ लेखक - □य□□ □य□न
अनुवाद - डॉ. प्रमोद जोगळेकर

६. □व□□ लेखक - श□□□ च□पा□□
अनुवाद - मृणालिनी गडकरी

७. फु□□ □ल लेखक - आ□ सा□ अनुवाद - सुनीती देशपांडे

बरोबर उत्तर पाठवणाऱ्यांपैकी लॉट टाकून पहिल्या तीन स्पर्धकांना
प्रत्येकी शंभर रुपयांची पुस्तके बक्षीस.

**बक्षीस जिंकण्यासाठी मेहता मराठी ग्रंथ जगतचे सभासद असणे आवश्यक.**




# वाचनातून विज्ञान

**लेखक : डी. एस. इटोकर**

## परीक्षा आपल्या सर्वसामान्य ज्ञानाची

या सृष्टीत अनेक घटना सातत्याने घडत असतात आणि आपण त्या तशा घडणारच हे गृहीत धरून त्यांच्याकडे बघत असतो. विज्ञान मात्र या घटनांची कारण परंपरा शोधण्याचा प्रयत्न करीत असते. त्यासाठी वेगवेगळ्या प्रयोगप्रणालींची योजना करीत असते. नवनवे शब्द वा संज्ञा उपयोगात आणत असते. आपल्या मुलामुलींमध्ये जिज्ञासूवृत्ती विकसित झाली तर प्रत्येक गोष्टींच्या मुळाशी जाण्यापी प्रवृत्ती वाढीला लागेल, आणि त्यांचे निसर्गाचे आकलन अधिक नेमके व नेटके होऊन, त्या ज्ञानाचा उपयोग करण्याचे नवनवे मार्ग सुचतील. मुलांना आपल्या अवतीभवती बघताना अनेक प्रश्न पडले पाहिजेत; आणि त्या प्रश्नांची उत्तरे वडीलधाऱ्यांकडून वा पुस्तकांतून मिळवण्याची जिद्द त्यांच्यात दिसायला हवी.

वाचनातून विज्ञान या पुस्तकात बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीचे कलाशिक्षक डी. एस. इटोकर यांनी मुलांना पडणाऱ्या ४३० प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. हे प्रश्न सामान्य ज्ञान, निसर्ग, यंत्र-उपकरणे, संज्ञापन माध्यमे, प्राणी सृष्टी, शरीरशास्त्र, रसायन शास्त्र, भौतिकशास्त्र वगैरेंशी संबंधित आहेत. ऊर्जा म्हणजे काय ? ऊर्जेचे नियम काय ? सूर्य हा ऊजेचा मोठा स्त्रोत आहे असे का म्हणतात ? ऊर्जेची रुपे कोणकोणती आहेत ? (यांत्रिक ऊर्जा, उष्णता ऊर्जा, विद्युत, प्रकाश, चुंबकीय, ध्वनी, रासायनिक ऊर्जा) अशासारख्या प्रश्नांतून त्या त्या विषयाची वेगवेगळी अंगे स्पष्ट होऊ शकतात. हे प्रश्न एकेक विशिष्ट विभाग पाडून एकत्र न देता, सरमिसळ करून दिले आहेत. त्यामुळे पाठ्यपुस्तकासारखा कंटाळा येण्याचे कारण नाही.

या पुस्तकात दिलेल्या पुढील काही प्रश्नांची उत्तरे तुम्ही आधी देण्याचा प्रयत्न करा. ती देता आली तर उत्तमच ! नाहीतर पुस्तकातून शोधून काढा.

१. घाबरणे म्हणजे काय ? (३७)
२. ग्लासभर पाण्यात किती धुके तयार होईल ? (३३)





## आपल्या सामान्य ज्ञानाचा तुम्हाला कितपत अभिमान आहे?

३. काकडीचे वरचे टोक कडू का लागते ? (२६)
४. कमळाचे पान जलाशयावर का तरंगते ? (२४)
५. उडणारी खार कशी असते ? (१६)
६. कापूर हवेत उघडा ठेवल्यास उडून जातो का ? (३०)
७. गरम तव्यावर पडलेला पाण्याचा थेंब टणाटण उड्या का मारतो ? (३४)
८. गरम चहा पिण्यासाठी चिनीमातीचा कप का वापरतात ? (३७)
९. घोडा उभ्यानेच का झोपतो ?
१०. घुबडाला रात्री का दिसते ? (४२)
११. पाल छतावर उलटी कशी चालू शकते ? (४३)
१२. जलचर प्राण्यांना ऑक्सिजन कसा मिळतो ? (४६)
१३. डायनोसॉरचे वजन किती होते ? (५०)
१४. तापवल्यावर दूध उतू का जाते ? (५४)
१५. तेल व पाणी एकमेकात का मिसळत नाहीत ? (५४)
१६. थ्री पीन प्लगमध्ये एक पीन मोठी का असते ? (५७)
१७. दव व धुके कसे तयार होते ? (६०)
१८. दवबिंदूतून गवताचे पान मोठे का दिसते ? (६४)
१९. धोक्याच्या ठिकाणी लाल रंगाचा दिवा का लावतात ? (६६)
२०. नारळात पाणी कोठून येते ? (६८)
२१. नालाकृती सरोवरे कशी तयार होतात ? (७२)
२२. पोटात दुखते तेव्हा नेमके काय होते ? (७५)
२३. पाऊस धाराच्या रुपातच का पडतो ? (७६)
२४. पाण्यात बुडालेली व्यक्ती लगेच खाली जाते. पणतीच ७२ तासांनी परत आपोआप वर येते का ? (७९)
२५. पाणी कसेही फेकले तरी गोल थेंबांच्या रूपातच खाली का पडते ? (८०)
२६. पिवळ्या फॉस्फरसला हाताने स्पर्श का करू नये ? (८६)
२७. प्रेक्षकांनी भरगच्च भरलेल्या प्रेक्षागृहात अस्वस्थ का वाटते ? (८८)
२८. पातळ काच हवेत कैचीने सरळ कापता येत नाही का ? (८८)
२९. फाउंटनपेनच्या टोपणाला एक बारीक छिद्र का असते ? (९१)
३०. काही फळे गोड तर काही आंबट का असतात ? (९२)
३१. मुंग्या रांगेने का चालतात ? (१०३)
३२. म्हातारपणी केस पांढरे का होतात ? (१०२)




## नित्याच्याच घटनामागची वैज्ञानिक कारणे आपल्याला माहीत असायला हवीत.

३३. रायफलच्या गोळीचा वेग किती असतो ? (१०८)
३४. रात्री झाडाखाली का झोपू नये ? (१११)
३५. शिंका का येतात ? (१२७)

या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर हे शास्त्रीय परिभाषेत देता यायला हवे. गोळाबेरीज उत्तर देणे पर्याप्त नाही... असे ४३० प्रश्न या पुस्तकात आहेत. आपल्या सामान्य ज्ञानाचीही त्यामुळे चाचणी होऊन जाईल.

विद्यार्थ्यांना एकमेकांना या पुस्तकातील प्रश्न विचारून आपल्या ज्ञानाचा टेंभा मिरवता येईल. कौन बनेगा करोडपतीसारख्या कार्यक्रमामुळे विशिष्ट प्रश्नांची बरोबर उत्तरे देण्याची क्षमता ही आर्थिक लाभही देऊ शकते. त्यासाठी वाचनातून विज्ञानसारखी पुस्तके उपयुक्त ठरतील.

**पृष्ठे : १६२ किंमत : १०० रु. सभासदांना : ७५ रु. पोस्टेज : २० रु.**

## मेहता मराठी ग्रंथजगत

**जानेवारी २००३ पासून मेहता मराठी ग्रंथजगतची**

**वार्षिक वर्गणी १०० रु !**

**आजच वर्गणीचे नूतनीकरण करा !**

जानेवारी २००३ पासून मेहता मराठी ग्रंथजगतची वार्षिक वर्गणी १००रु झाली आहे. सर्व सभासदांनी आपल्या वर्गणीचे नूतनीकरण डिसेंबर २००२ पर्यंत केल्यास ८० रु वर्गणी भरावी लागेल. तीन व पाच वर्षाच्या वर्गणीत कोणतीही वाढ करण्यात आली नाही. याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.





# आयडियल कांताशेठ


**वामन देशपांडे**

आपल्या भाग्यकुंडलीत काही योग असे काही उमटलेले असतात की आपलाच आपल्याला हेवा वाटतो. खूप जन्मांची पुण्याई फळाला यावी तसा एखादा मित्र भेटतो. दादरच्या छबिलदास गल्लीतली 'आयडियल बुक कंपनी' आणि तिचे सर्वेसर्वा श्रीकान्ताशेठ नेरूरकर हा माझ्या जन्मकुंडलीतला विलक्षण असा भाग्ययोग. वीस-पंचवीस वर्षे झाली त्या भाग्यकहाणीला. वाहते प्रेम असूनही प्रत्यक्ष भेटायला वेळ नसलेला हा माझा एकमेव मित्र. पंढरपूरातल्या मंदिरात श्रीविठ्ठल जसा सदैव उभा तसे कान्ताशेठ नेरूरकर 'आयडियल'च्या लक्ष्मीभरल्या काउंटरवर सदैव उभे. दुकानात पुस्तके विकत घेण्याऱ्यांची प्रचंड गर्दी. एकाच वेळी अनेकांशी बोलत उत्तम व्यवहार करणारे पुस्तकप्रेमी कान्ताशेठ हे खरे तर आश्चर्याला पडलेले विलक्षण कोडे. पुस्तक--- केवळ नव्हे तर लेखक-प्रकाशकांवरील अतीउत्कट प्रेमाचे चालते-बोलते प्रतिक. आपल्या सर्वच गिऱ्हाईकांना प्राणपणाने सांभाळणारे कान्ताशेठ एकूणच ग्रंथविश्वाशी इतके एकरूप होऊन गेलेले आहेत की सूर्यकिरणे जशी सूर्यापासून विलग होत नाहीत. कान्ताशेठना प्रत्येक पुस्तक वाचणे कधीच शक्य होणार नाही. परंतु रत्नपारखीवृत्ती विलक्षण तन्मयतेने त्यांनी जोपासलेली आहे. दुकानात येणारे प्रत्येक पुस्तक ते चाणाक्ष नजरेने चाळतात आणि मोहिनी घालणारे पुस्तक असेल तर पूर्ण वाचून काढतात. वृत्तपत्रातल्या रविवार आवृत्त्यांमधून प्रसिद्ध होणारी पुस्तक परीक्षणे आवर्जून वाचतात. शिवाय रसिक वाचकांचा प्रज्ञावान लेखकांचा आणि ग्रंथप्रकाशकांचा 'आयडियल'मध्ये सतत राबता असतो. त्यांच्याशी बोलून कान्ताशेठ एकूणच ग्रंथव्यवहाराचा 'एरिअल व्ह्यू' सतत घेत असतात. वाङ्मयीन दृष्ट्या अत्यंत चांगले आणि खपाच्या दृष्टीने निश्चितपणे उत्तम ठरेल असं पुस्तक प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्यांच्या 'रडार'वर येते. अशा पुस्तकांचे उत्तम प्रकाशन समारंभ कान्ताशेठ स्वत: आपणहून करतात. वाङ्मयीन उत्सव दिवाळीच्या उत्साहाने साजरे करतात. कान्ताशेठचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य काय तर लेखकांचा आणि प्रकाशकांचा आनंद ते आपला आनंद म्हणून मिरवतात. वैयक्तिक सुखदु:खे कधीही प्रगट न करणारा हा आमचा वडिलधारी परममित्र अष्टौप्रहर केवळ ग्रंथविश्वाशीच निगडीत झालेला आहे. संत नामदेवाने श्रीविठ्ठलाच्या नामस्मरणात आपला प्रत्येक श्वास गुंफला होता. ग्रंथव्यवहारातल्या ह्या आधुनिक नामदेवाने एकूणच अभिजात ग्रंथव्यवहार आपल्या श्वासात गुंफला आहे एवढे कान्ताशेठ पुस्तकव्यवहाराशी एकरूप झालेले आहेत.

'आयडियलचा' हा ग्रंथव्यवहाराचा प्रचंड विस्तार वाढला त्याची मूळ गंगोत्री नाना नेरूरकरांशी एकवटलेली आहे. नानांचा जन्म १६ ऑक्टोबर १९०२ रोजी दक्षिण कोकणातल्या नेरूर ह्या छोट्या गावात झाला. वडिलांचे छत्र लहानपणीच हरवले. सर्वांची जबाबदारी नानांवर पडली. वय अवघे १०-१२ वर्षांचे. नशीब काढण्यासाठी नाना


नाना नेरूरकर


कान्ताशेठ नेरूरकर



मंदार नेरूरकर

मुंबईत आले. खूप काबाडकष्ट केले. खांद्यावरून पुस्तकांची ओझी वाहिली. लाखानीमध्ये काम करताना दुकानाचा केर काढण्यापासून नानांना कामे करायला लागली. परंतु स्वत:च्या हिंमतीवर ४ जानेवारी १९३७ ह्या शुभ दिवशी नानांनी ह्याच छबिलदासच्या गल्लीत एक गाळा घेतला आणि ‘आयडियल’ची स्थापना केली. अपार कष्ट आणि त्यांच्या चार मुलांचे प्रचंड योगदान ह्या बळावर नानांनी दुकानाचा विस्तार केला. एका ‘बी’जाचे प्रचंड वटवृक्षात रूपांतर झाले. शेजारी स्टेशनरीचा काळा काढला. बाळाशेठ, सदानंदशेठ, कान्ताशेठ आणि छोटुशेठ या चार भावंडांनी आपल्या वडिलांना खूप मदत केली. एकजुटीने व्यवहार केला. १९८७ साली भव्य सुवर्णमहोत्सव सादरा केला. १९७७ साली नानांचा अपघाती मृत्यू झाला. त्यानंतर कान्ताशेठनी दुकानाची धुरा आपल्या खांद्यावर घेतली. त्यांना त्यांच्या तीनही भावांनी विलक्षण साथ दिली. कान्ताशेठचे वाचन अफाट, माणसांना एकत्र करायची अजब ताकद, एक लक्षात घ्या की, ‘प्रेम अर्पण करतात ती माणसे निराळी असतात.’

ही कवितेची ओळ सार्थ करण्याची विलक्षण हातोटी कान्ताशेठच्या व्यक्तिमत्त्वात दडलेली. काऊंटरवर उभे असताना काय घडते तर त्यांना आपल्याशी बोलायला एक मिनिटाची फुरसत नसते. काऊंटरवरचे नेहमीचे दृश्य काय तर एका हाताने पैसे घेत, दुसऱ्या हातात फोनवरचा रिसिव्हर घेऊन बोलण्यात मग्न आणि लक्ष मात्र केवळ गिऱ्हाईकांकडे. आपण दुकानात गेल्यावर थांबायची खूण करणार. काही वेळाने क्षणभरासाठी पाठीमागल्या ‘त्रिवेणी’त डोकावणार. अर्धा कप चहा आपल्याला पाजून पुन्हा पुढच्या काऊंटरवर धावत जाणार. रोज सकाळी नऊ ते रात्री नऊ, एक सोमवार सोडला, तर हे एकच चित्र ‘आयडियल’मध्ये दिसणार. आपल्या ह्या भाग्यशाली व्यवसायाशी पूर्णपणे एकरूप झालेले कान्ताशेठ लेखकांवर विलक्षण प्रेम करतात. विशेष म्हणजे लेखकांचेसुद्धा कान्ताशेठवर आणि ‘आयडियल’वर विलक्षण प्रेम आहे. मराठीतले प्रत्येक लेखक कान्ताशेठना ओळखतो. त्याला एक ठाऊक आहे की आपली पुस्तके ‘आयडियल’मध्ये आहेत. एक लक्षात घ्या की मराठीतले प्रत्येक पुस्तक ‘आयडियल’मध्ये निश्चितपणे मिळते. दादर स्टेशनपासून मिनिटभराच्या अंतरावर असलेले ‘आयडियल’ सर्वांनाच सोयीचे पडते. कान्ताशेठ नेरूरकर ह्यांच्या स्वभावाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा निष्कपट स्वभाव; धंद्यावरची अढळ निष्ठा, अत्यंत चोख हिशोब आणि मराठी साहित्यविश्वाशी त्यांनी जोपासलेले अप्रतिम असे हवेहवेसे वाटणारे आयडियल संबंध... ‘आयडियल’च्या यशाचा मुख्य स्रोत कान्ताशेठच्या ह्या स्वभावधर्माशी निगडीत आहे. खूप वेळेला मनात विचार येतो की सर्व प्रकाशकांची आणि लेखकांची ‘आयडियल’ ही पंढरी आहे. ह्या पंढरीत पाऊल टाकल्याशिवाय खरे तर कुणालाच चैन पडत नाही... लेखक, कवी, समीक्षक, वाचक, प्रकाशक, मुद्रक ह्यांचा प्रचंड गोतावळा कान्ताशेठनी जमा केला.

वृत्तपत्रांनी ‘आयडियल’चे कौतुक केले. त्याचा दुसरा परिणाम असा झाला की महाराष्ट्रभर







‘आयडियल’चा कीर्तीसुगंध पसरला. नवनवीन योजना आणि पुस्तकविक्रीमधला प्रचंड अनुभव या बळावर कान्ताशेठ पुस्तकविक्रीमध्ये चमत्कार ठरले. लोकांना लळा लागळा. त्यातून ‘आयडियल’चे नाव मोठे झाले. गेल्या काही वर्षात कान्ताशेठचा मुलगा मंदार याची तरुण साथ ‘आयडियल’ला मिळाली. मंदारने दिवाळी अंकाची योजना यशस्वीपणे राबवली. प्रसिद्धी माध्यमांना हाताशी धरून आपल्या कष्टांची आणि कर्तृत्वाची ध्वजा फडफडत ठेवली. १९९३ ते २००२ एवढा प्रचंड प्रवास एका पुस्तकविक्रेत्याने केला याची ही यशस्वी कहाणी... साठा उत्तरी सफल झालेली. यशाचे गमक आहे. कुठलाही व्यवसाय हा सचोटी प्रामाणिकपणा आणि अपार कष्ट ह्या बळावर समृद्ध होतो. ‘आयडियल’हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. एका अथक श्रमाची ही यशस्वी कला आहे. ‘आयडियल’ने सुद्धा चढ-उतार अनुभवले. परंतु प्रत्येक अडचणीतून मार्ग काढला आणि ‘आयडियल’चे नाव मोठे केले.

कान्ताशेठ नेहमी म्हणतात की, ‘‘ लोकांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. त्यांच्या या बळावर तर ‘आयडियल’ उभे आहे. मुख्य म्हणजे मला स्वत:ला गर्दीचे वेड आहे. गर्दीत वाढणारा मी माणूस. आमच्या दुकानाचे भाग्य आणि नानांची पुण्याई, दुकानात सर्दैव गिऱ्हाईकांची प्रचंड गर्दी असते. मला नेहमी वाटते की पुस्तकव्यवहार हा केवळ धंदा नसून ती एक सुंदर आणि हवीहवीशी वाटणारी चळवळ आहे.’’

पुस्तकांची विक्री वाढावी म्हणून कान्ताशेठनी गेल्या काही वर्षात खूप प्रयोग केले. महाराष्ट्रातल्या एका सर्वोत्तम वाचकाला ‘आयडियल सुवर्ण मोहोर’ देणारे कान्ताशेठ म्हणजे पुस्तकविक्रीतले एकमेव उदाहरण. सर्वदूर पसरलेल्या वाचकांशी थेट संपर्क साधणारे कान्ताशेठ, प्रकाशकांशी सुसंवाद करणारे कान्ताशेठ, गिऱ्हाईकांच्या मनाचा थेट वेध घेणारे कान्ताशेठ, लेखकांवर प्रेमाची चांदण-बरसात करणारे कान्ताशेठ, पुस्तक व्यवसायात पडद्याआड राहून काम करणाऱ्या माणसांशी प्रेमाने संबंध ठेवणारे कान्ताशेठ, स्तंभलेखन करणाऱ्या लेखकांचे चळवळ उभी करणारे कान्ताशेठ आणि कुटुंबवत्सल कान्ताशेठ ही एकाच कान्ताशेठ नेरूरकरांची रूपे आहेत हे सांगून कदाचित खरे वाटणार नाही. ही आली त्यांची सात रूपे. आपल्या मित्रांना सर्वतोपरी मदत करणारे कान्ताशेठ नेरूरकर पुस्तक व्यवसायातले एक मोठे आश्चर्य आहे. दुकानात बोलायला वेळ मिळत नाही म्हणून घरून दूरध्वनीवरून संपर्क ठेवणारे कान्ताशेठ हे खरे तर हवेहवेसे वाटणारे रूप आहे. त्यांना प्रत्यक्ष भेटले नाही तर आपल्याला चैन पडत नाही हा माझा अनुभव आहे. त्यांची कृपा लाभणे हा आपल्या देवकुंडलीत योग असावा लागतो. पुस्तकविक्री क्षेत्रात स्वत:ला झोकून देणारा कान्ताशेठ नेरूरकर यांच्यासारखा ‘आयडियल’ विक्रेता दुर्मिळच !




## मा. कृ. पारधी यांना माधव मनोहर पुरस्कार

रंगत संगत प्रतिष्ठानतर्फे देण्यात येणारा 'माधव मनोहर पुरस्कार' या वर्षी ज्येष्ठ नाट्यसमीक्षक मा. कृ. पारधी यांना देण्यात आला.

पाच हजार रोख, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. या समारंभाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर पणशीकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून संगीत समीक्षक दत्ता मारुलकर, ज्येष्ठ नाट्यसमीक्षक डॉ. वि. भा. देशपांडे उपस्थित होते.

## शांतिलाल भंडारी यांना आचार्य विद्यानंद पुरस्कार

साहित्य क्षेत्रातील उत्तम कामगिरीबद्दल दक्षिण भारत जैन सभा संस्थेच्या वतीने देण्यात येणारा 'आचार्य विद्यानंद पुरस्कार' यंदा पुण्याचे शांतिलाल भंडारी यांना जाहीर झाला.

हा पुरस्कार साहित्याच्या माध्यमातून समाजाची सेवा केल्याबद्दल श्री. भंडारी यांना हा ५ हजारांचा पुरस्कार २० ऑक्टोबरला बाहुबली (ता. हातकणंगले) येथे अधिवेशनात देण्यात आला.

## डॉ. प्रमोद मुनघाटे यांना साहित्य अकादमीची प्रवासवृत्ती

नागपूर येथील सेंट फ्रान्सिस डी सेल्स महाविद्यालयातील विभाग प्रमुख व नागपूर विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेचे सहसचिव डॉ. प्रमोद मुनघाटे यांना साहित्य अकादमीने प्रवासवृत्ती प्रदान केली आहे. या योजनेअंतर्गत डॉ. प्रमोद मुनघाटे उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील ऐतिहासिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांना भेट दिली.

डॉ. प्रमोद मुनघाटे यांना यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाची पाच वर्षांची संशोधन वृत्ती मिळाली होती. त्यांच्या 'अठराशे सत्तावन : सत्य आणि कल्पित' या पुस्तकाला १९९४ चा उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार असून सध्या ते विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रकल्पाअंतर्गत संशोधन करीत आहेत.

## सकाळ नाट्यलेखन स्पर्धेचा निकाल

'सकाळ नाट्यवाचन समिती'तर्फे शहर विभागातील शिक्षकांसाठी घेण्यात आलेल्या आंतरशालेय मराठी, हिंदी आणि संस्कृत नाट्यलेखन स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. तो पुढीलप्रमाणे :

मराठी नाट्यलेखन : प्रथम : अद्वैता उमराणीकर (अहिल्यादेवी प्रशाला); द्वितीय : शंकर आथरे (गोदावरी हिंदी विद्यालय, चिंचवड); तृतीय : रेखा देशमुख (एच. एस. सी. पी. प्रशाला,



हुजूरपागा) उत्तेजनार्थ : १) प्रतिभा तापकीर (अहिल्यादेवी प्रशाला); २) अश्विनी भालेराव (श्री बल्लाळेश्वर प्रतिष्ठान मुलींची पर्यायी शाळा); ३) निवेदिता मेहेंदळे (रेणुका स्वरूप प्रशाला)

हिंदी नाट्यलेखन : प्रथम : कल्पना जाखडे (विद्यापीठ हायस्कूल); द्वितीय : सुचित्रा कुलकर्णी (विजयवल्लभ हायस्कूल, भवानी पेठ); तृतीय : सुषमा नाडकर्णी (सिंहगड स्प्रिंगडेल स्कूल). उत्तेजनार्थ : गीता खाडे (नू. म. वि. मुलींची प्रशाला)

संस्कृत नाट्यलेखन : प्रथम : डॉ. अनुराधा थत्ते (डी.ई.एस. सेकंडरी स्कूल, टिळक रोड); द्वितीय : मंगला रिसबूड (पी. ई. एस. गर्ल्स स्कूल); तृतीय : सौ. राजे (एम. एस. एस. हायस्कूल, चिंचवड). उत्तेजनार्थ : अपर्णा थत्ते (अहिल्यादेवी प्रशाला)

स्पर्धेच्या परीक्षणाचे काम जयश्री कुबेर यांनी पाहिले. स्पर्धेच्या नियोजनाचे काम समितीचे संघटक सचिव सुधाकर मोहरीर यांनी केले.

## महाबँक लेखन पुरस्कार अरुण फडके यांना जाहीर

मराठी अभ्यास परिषद व बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे देण्यात येणारा 'महाबँक भाषाविषयक लेखन पुरस्कार' यंदा अरुण फडकेलिखित 'मराठी लेखन कोश' या पुस्तकाला जाहीर झाला असून, १५ डिसेंबरला पुरस्कार वितरण होणार आहे. पाच हजार रुपये व मानपत्र, असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. निवड समितीत डॉ. विद्यागौरी टिळक, डॉ. गं. ना. जोगळेकर आणि प्रा. प्र. ना. परांजपे (निमंत्रक) यांनी काम पाहिले.

## 'सूफी संप्रदायाचे अंतरंग'ला तत्त्वज्ञान परिषदेचा पुरस्कार

संगमनेरच्या डॉ. अलीम वकील यांच्या 'सूफी संप्रदायाचे अंतरंग' ग्रंथाला महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद व कोल्हापूरचे गोएंका फाउंडेशन यांनी पुरस्कार दिला आहे. तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र किंवा धर्मचिंतन या विषयावरील सर्वोत्कृष्ट ग्रंथास पुरस्कार दिला जातो. द्वितीय क्रमांकासाठी शांतिलाल भंडारी यांच्या 'भगवान महावीर' ग्रंथाची, तर कोल्हापूरच्या प्रा. कृष्ण गुरव यांच्या 'कैवल्यदीप' ग्रंथाची निवड झाली आहे. परीक्षक म्हणून डॉ. श्री. व्यं. बोकील आणि डॉ. प्रकाश सोमण यांनी काम पाहिले.

विश्वनाथ ओक स्मृती खुल्या निबंध स्पर्धेत बीडच्या कमलिनी बोकरिया यांना प्रथम, तर डोंबिवलीच्या प्रतिभा बिवलकर यांना द्वितीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेसाठी 'स्त्री संतांचे विचारधन' हा विषय होता. परीक्षक म्हणून डॉ. सुनीती जोशी व डॉ. समिता टिल्लू यांनी काम पाहिले.

## दत्ता डावजेकर यांना 'गदिमा' पुरस्कार

ज्येष्ठ साहित्यिक ग. दि. माडगूळकर यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा 'गदिमा पुरस्कार' यंदा ज्येष्ठ संगीतकार दत्ता डावजेकर यांना जाहीर झाला आहे. विद्याताई माडगूळकर यांच्या स्मृतीनिमित्त दिला जाणारा 'गृहिणी सखी सचिव' पुरस्कार रेखा कामत यांना, नवोदित कलांवंतांसाठीचा 'चैत्रबन पुरस्कार' मृणाल देव-कुलकर्णी यांना आणि 'गदिमा स्नेहबंध' पुरस्कार मधुकर कुलकर्णी यांना जाहीर झाला आहे.

१४ डिसेंबरला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते येथील टिळक

स्मारक मंदिरात हे पुरस्कार प्रदान केले जातील. ''लता मंगेशकर यांना गाण्याची पहिली संधी देणाऱ्या दत्ता डावजेकर यांनी मराठी रसिकांना अनेक अविस्मरणीय मराठी गीतांची भेट दिली आहे. पुरस्काराच्या रूपातून त्यांना दहा हजार रुपये देण्यात येतील.

प्रसिद्ध पटकथालेखक ग. रा. कामत यांच्या पत्नी असणाऱ्या रेखा कामत यांना 'गृहिणी सखी सचिव' पुरस्कारापोटी पाच हजार रुपये आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात येणार आहे.''

**बालकुमार साहित्य संमेलनाचे पुरस्कार (इ. स. २००१मधील साहित्यासाठी)**

१. लीला दीक्षित (बहादूर बल्लू - बालकादंबरी) जोशी पुरस्कार
२. मुकुंद निगवेकर (बछडा - किशोर कथा) दयार्णव कोपर्डेकर पुरस्कार
३. प्रशांत गौतम (शूर झाले वीर - बालकथा) वा. गो. आपटे पुरस्कार
४. विनया साठे (बछडी चिऊ - शिशुकथा) वेणूताई अरगडे पुरस्कार
५. ज्ञानदा आसोलकर (आंब्यावरचे गाणे - काव्य) ग. ह. पाटील पुरस्कार
६. भारत सासणे (चल रे भोपळ्या - नाटक) चिं. वि. जोशी पुरस्कार
७. विश्वास वसेकर (बालसाहित्याचे अंतरंग - समीक्षा) सीताबाई भागवत पुरस्कार
८. रमेश सहस्रबुद्धे (रसायनशास्त्र रंजकता - विज्ञान) श्री. बा. रानडे पुरस्कार
९. दिवाकर बापट (कुस्तीवेडा राजपुत्र - चरित्र) रा. गो. देसाई पुरस्कार
१०. रघुवीर साखवळकर (घर हीच प्रयोगशाळा - छंद) बा. मा. भिडे पुरस्कार
११. माधुरी पुरंदरे (झाड लावणारा माणूस - अनुवाद) मेहता प्रकाशन पुरस्कार
१२. शीतल शहाणे (काठीचा घोडा - सजावट) सर्जेराव जगताप पुरस्कार
१३. बाबा भांड, साकेत प्रकाशन, औरंगाबाद - उत्तम प्रकाशक पुरस्कार
१४. डॉ. सुलभा शहा (मराठी बालवाङ्मय) सुलोचना नातू पुरस्कार
१५. क. दि. सोनटक्के (डॉ. गेंडे आणि मित्रमंडळी - रुपांतर) भा. रा. भागवत पुरस्कार
१६. नारायण अरगडे - दिनकर लोखंडे बालसाहित्य जत्रा पुरस्कार
१७. शाशिकांत महाडेश्वर - अमरेंद्र गाडगीळ शोधनिबंध पुरस्कार
१८. बाळकृष्ण शा. बुवा - अमरेंद्र गाडगीळ शोधनिबंध पुरस्कार
१९. आबा महाजन (गमतीच्या राज्यात) प्रथम प्रकाशन पुरस्कार
२०. रजनी दाते (एकांकिका) पुरस्कार
२१. दिवाळी अंक बालमित्र पुरस्कार - छात्रप्रबोधन आणि बालवाडी

परीक्षक म्हणून सुधाकर प्रभू, शंकर सारडा, दत्ता टोळ, कल्याण इनामदार, शकुंतला फडणीस, निर्मला सारडा, ल. म. कडू, शि. द. फडणीस, ज. म. जोशी यांनी काम पाहिले.

पुरस्कार वितरण सातारा येथे होणाऱ्या १६ व्या अ. भा. बालकुमार साहित्य संमेलनात दि. २२ डिसेंबर २००२ रोजी होणार आहे



## महाराष्ट्र राज्य ग्रंथ पुरस्कार - २००१-०२

| पुरस्काराचे नाव | वाङ्मयप्रकार | पुस्तक | लेखक |
|---|---|---|---|
| **रक्कम - १०००/-** | | | |
| कवी केशवसुत पुरस्कार | काव्य | फिनिक्स | हिरा बनसोडे |
| बालकवी पुरस्कार | काव्य | तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर | सायमन मार्टिन |
| राम गणेश गडकरी पुरस्कार | नाटक | शोभायात्रा | शफाअत खान |
| अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार | नाटक | वस्त्रहरण | गंगाराम गवाणकर |
| हरी नारायण आपटे पुरस्कार | कादंबरी | धूळपेरणी | शेषराव मोहिते |
| वि. स. खांडेकर पुरस्कार | कादंबरी | हाताची घडी तोंडावर बोट | माधव कोंडविलकर |
| दिवाकर कृष्ण पुरस्कार | कथा | फणसाखालचं घर | चंद्रकुमार नलगे |
| पु. भा. भावे पुरस्कार | कथा | तुफानातील दिवे | भीमासेन देठे |
| अनंत काणेकर पुरस्कार | ललितगद्य | झळाळ | वासंती मुझुमदार |
| वि. द. घाटे पुरस्कार | ललितगद्य | अशी घरं अशी माणसं | मंगला गोडबोले |
| लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार | चरित्र - आत्मचरित्र | एका अनामिकाची कहाणी | डॉ. श्रीरामचंद्र अनंतराव कडियाळ |
| न. चि. केळकर पुरस्कार | चरित्र - आत्मचरित्र | हसरी किडनी | पद्मजा फाटक |
| श्री. के. क्षीरसागर पुरस्कार | समीक्षा - सौंदर्यशास्त्र. | साहित्य प्रत्यय | भा. ल. भोळे |
| नरहर कुरुंदकर पुरस्कार | समीक्षा - सौंदर्यशास्त्र | निळी वाटचाल | दत्ता भगत |
| महात्मा जोतिराव फुले पुरस्कार | इतिहास, अर्थशास्त्र राज्यशास्त्र, समाजशास्त्र | आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण | व. मं. सिरसीकर |
| डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार | इतिहास, अर्थशास्त्र राज्यशास्त्र, समाजशास्त्र | भटक्या विमुक्तांची जातपंचायत | रामनाथ नामदेव चव्हाण |
| कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार | तत्त्वज्ञान, मानसशास्त्र शिक्षणशास्त्र | मुस्लिम मनाचा शोध | शेषराव मोरे |
| यशवंतराव चव्हाण पुरस्कार | तत्त्वज्ञान, मानसशास्त्र शिक्षणशास्त्र | शिक्षण आणि समाज | रावसाहेब शिंदे |
| ना. गो. कालेलकर पुरस्कार | भाषाशास्त्र व व्याकरण | श्रीमत् ग्रंथराज दासबोध शब्दार्थ संदर्भ कोश | मुकुंद श्रीनिवास कानडे |
| दादोबा पांडुरंग पुरस्कार | भाषाशास्त्र व व्याकरण | साकेत शालेय मराठी शब्दकोश | स. द. झांबरे |
| सी. डी. देशमुख पुरस्कार | भौतिकशास्त्र-तंत्रविज्ञान | माहिती तंत्रज्ञान व स्वयंरोजगार | एस. टी. दाभाडे |
| एन. आर. तावडे पुरस्कार | भौतिकशास्त्र-तंत्रविज्ञान | जैवतंत्रज्ञान | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| मामा वरेरकर पुरस्कार | एकांकिका | अंधारवेणा | डॉ. सतीश पावडे |
| श्रीपाद कृष्ण कोल्हटकर व आचार्य अत्रे पुरस्कार | विनोद | शेवटची लढाई | आनंद यादव |

| | | | |
|---|---|---|---|
| र. धों. कर्वे पुरस्कार | ललित विज्ञान | जावे विज्ञानाच्या गावा | डॉ. बाळ फोंडके |
| भाई माधवराव बागल पुरस्कार | संकीर्ण | मराठवाड्यावरील सूची | प्रा. श्रीधर बळवंत |
| राजर्षी शाहू महाराज पुरस्कार | क्रीडा शास्त्र | व्यावहारिक पतंजलि भाग १, भाग २ | गायत्री-भलराज न्हावकर (विभागून) |
| तर्कतीर्थ लक्ष्मणराव जोशी पुरस्कार | अनुवाद | कस्तुरबा : शलाका तेजाची | अशोक जैन |
| डॉ. वि. भि. कोलते पुरस्कार | संपादित | चांगदेव चतुष्ट्यासंबंधी | राजन गवस |
| संत गाडगेमहाराज पुरस्कार | आधारित | समजत आणि उमज | मधुकर तोरडमल |
| ग. त्र्यं. माडखोलकर पुरस्कार | संशोधन | शिवकाळ व पेशवाईतील महारांचा इतिहास | अनिल कटारे |
| पु. ल. देशपांडे पुरस्कार | ललितकलाआस्वादपर लेखन | व्यंगचित्र : एक संवाद | वसंत सरवटे/ मधुकर धर्मापुरीकर |
| वसंतराव नाईक पुरस्कार | शेती/शेतीपूरक लेखन | शेतीचा दवाखान | डॉ. शिवाजीराव ठोंबरे |
| **बृहन्महाराष्ट्र लेखन पुरस्कार** | | | |
| विठ्ठल रामजी शिंदे पुरस्कार | | गोकुली | प्रफुल्लता जाधव |
| सयाजीराव महाराज गायकवाड पुरस्कार | | स्वामी रामानंदतीर्थ यांची दैनंदिनी | वि. पां. देऊळगांवकर |
| **रक्कम - ५०००/-** | | | |
| लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार | दलित, पददलित साहित्य | आगडोंब | जयराज खुने |
| रँग्लर परांजपे पुरस्कार | संगणक, इंटरनेट, पर्यावरण व संरक्षणशास्त्र | प्रदूषणाच्या विळख्यात पृथ्वी | विवेक ए. भालेराव |
| **प्रथम प्रकाशन उपविभाग** | | | |
| **रक्कम - ५०००/-** | | | |
| बहिणाबाई चौधरी पुरस्कार | काव्य | मौनातील पडझड | अशोक कोतवाल |
| लोटू पाटील पुरस्कार | नाटक | सज्जन पाटलाचं भूत | धनाजीराव चौधरी |
| अण्णाभाऊ साठे पुरस्कार | कादंबरी | सुताराचा पोर | सनी पाटोळे |
| ग. ल. ठोकळ पुरस्कार | लघुकथा | अनिकेत | प्रकाश खरात |
| ताराबाई शिंदे पुरस्कार | ललितगद्य | मस्त कलंदर | बबन भेजराज नाखले |
| दादसाहेब धनवटे पुरस्कार | एकांकिका | इस्कोट आणि इतर एकांकिका | मनोहर धोत्रे |
| वा. रा. कांत पुरस्कार | अनुवादित | सआदत हसन मंटो | विश्वास वसेकर |
| ना. रा. चव्हाण पुरस्कार | संपादित | मायबोलीचा मराठवाडा | श्रीराम पाटील |
| कुसुमावती देशपांडे पुरस्कार | समीक्षा - सौंदर्यशास्त्र | नाटक - लोक आणि लौकिक | प्रकाश भेदककर |
| **विशेष पुरस्कार विभाग** | | | |
| **रक्कम - २०००/-** | | | |
| इंदिरा संत पुरस्कार | काव्य | प्रेमाचा शब्द | गोविंद कुलकर्णी |



| | | | |
|---|---|---|---|
| वि. वा. शिरवाडकर पुरस्कार | नाटक | रस्ते | डॉ. गो. पु. देशपांडे |
| उद्धव शेळके पुरस्कार | कादंबरी | उमाजी राजे | शंकर नऱ्हे |
| बी. रघुनाथ पुरस्कार | लघुकथा | तिची वाटच वेगळी | मधू सावंत |
| मधुकर केचे पुरस्कार | ललितगद्य | मेक्सिकोपर्व | डॉ. मीना सु. प्रभु |
| जयवंत दळवी पुरस्कार | एकांकिका | चतुरंग (संग्रह) | अशोक दिवेकर |
| दत्तू बांदेकर पुरस्कार | विनोद | विदेशी गुदगुल्या | आनंद गर्दे |
| कृष्णराव भालेराव पुरस्कार | संकीर्ण | भूमिसंपादन अधिनियम १८९४ अर्थउकल | ॲड. शिरीष गाडगे/ किशोर कऱ्हेकर |
| संत तुकडोजी महाराज पुरस्कार | ललित विज्ञान | वेदांतील विज्ञान | धनंजय देशपांडे |
| धनंजय कीर पुरस्कार | चरित्र-आत्मचरित्र | दादा : एक सेनानी स्वातंत्र्यवीर दादा उडोळकर यांचे चरित्र | विजय यादव |
| वा. ल. कुळकर्णी पुरस्कार | समीक्षा/सौंदर्यशास्त्र | बंदिशीतील सौंदर्य विचार | शुभांगी बहुलीकर |
| क्रांतिसिंह नाना पाटील पुरस्कार | इतिहास, अर्थशास्त्र राज्यशास्त्र, समाजशास्त्र | नाणेनिधी व जागतिक बँक यांचा नव-वसाहतवाद | चंद्रकांत केळकर |
| बॅ. नाथ पै पुरस्कार | तत्त्वज्ञान, मानसशास्त्र शिक्षणशास्त्र | भगवान महावीर | शांतिलाल भंडारी |
| ना. गो. नांदापूरकर पुरस्कार | भाषाशास्त्र-व्याकरण | मराठी व्याकरण-विवेक | प्रा. मा. ना. आचार्य |
| डॉ पंजाबराव देशमुख पुरस्कार | भौतिकशास्त्र-तंत्रविज्ञान | निरंजन घाटे | |
| **बाल वाङ्मय** | | | |
| **रक्कम - ५०००/-** | | | |
| भा. रा. तांबे पुरस्कार | कविता | सारे छान छोटे | वसुंधरा हुईलगोळकर |
| वा. गो. मायदेव पुरस्कार | कविता | भिंगर भिंगरी | किशोर पाठक |
| राम गणेश गडकरी पुरस्कार | नाटक | शामला हवाय कृष्ण | डॉ. सतीश साळुंके |
| शाहीर अमरशेख पुरस्कार | नाटक | ढब्बू ढोल रिमोट गोल | विनीता पिंपळखरे |
| गोपीनाथ तळवलकर पुरस्कार | कादंबरी | जगूची गोष्ट | आशा भाजेकर |
| सानेगुरुजी पुरस्कार | बालकथा | गजकथा | निनाद बेडेकर |
| कवी दत्त पुरस्कार | परीकथा | नावापुरत्या गोष्टी | मालती देशपांडे |
| ना. धों. ताम्हनकर पुरस्कार | परीकथा | ध, ध, धाडसाचा | लक्ष्मण लोंढे |
| वा. गो. आपटे पुरस्कार | एकांकिका | अरण्यगान | प्रा. नरेश नाईक |
| वि. कों. ओक पुरस्कार | चरित्रे | अमृतपुत्र विवेकानंद | दत्ता श्री टोळ |
| ग. ह. पाटील पुरस्कार | चरित्रे | देशभक्त शास्त्रज्ञ डॉ. होमी भाभा | रघुराज मेटकरी |
| रेव्हरंड ना. वा. टिळक पुरस्कार | ललितगद्य | हा वारसा तुमच्यासाठी | गोविंद गोडबोले |
| यदुनाथ थत्ते पुरस्कार | सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे) | जगाची मुशाफिरी | निरंजन घाटे |
| राजा केळकर पुरस्कार | सर्वसामान्य ज्ञान | क्ष किरणांची नवलकथा | डॉ. सतीश पांडे |
| दि. के. बेडेकर पुरस्कार | बालसाहित्य समीक्षा | शिफारस नाही | - |

**पुरस्कार प्राप्त झालेल्या सर्व लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन!**

# फुले आणि काटे

## भारतीय पुस्तकांची बाजारपेठ

भारतीय पुस्तकांची व नियतकालिकांची बाजारपेठ सतत वाढत आहे.

भारतीय पुस्तकांच्या आणि नियतकालिकांच्या व्यवसायाची उलाढाल दरवर्षी ७३०० कोटी रुपयांच्या घरात जाते. याशिवाय बांगलादेश भारतीय पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या चोरट्या आवृत्त्या काढून त्यांच्या निर्यातीद्वारे २००० कोटीं रुपयांवर कमाई करते असे आढळून आले आहे. त्यामुळे गेल्या दहा वर्षात आपल्या भारताच्या निर्यातीत वाढ होत असली तरी तिचे वाढीचे प्रमाण घटले आहे. १९९१-९२ नंतर गेल्या वर्षी प्रथमच आपली निर्यात घटली आहे.

खुद्द बांगला देशात भारतीय पुस्तकांच्या अनधिकृत आवृत्त्यांची विक्री कमी होते. बांगला देशाला निर्यात होणाऱ्या पुस्तकांच्या तुलनेने ती १.७ टक्के एवढी सीमित आहे. परंतु बांगला देशामध्ये मुद्रण हे स्वस्त असल्याने खपाऊ भारतीय पुस्तकांच्या चोरट्या आवृत्त्या तेथे काढणे हे फार फायदेशीर ठरते. अशी अनधिकृत पुस्तके बांगलादेशातून भारतात विक्रीसाठी येतात आणि ती मूळ पुस्तकाच्या निम्म्याअर्ध्या किंमतीत विकली जातात. मूळच्या भारतीय प्रकाशकांचे त्यामुळे मोठेच उत्पन्न बुडते. अशी माहिती केमिकल्स अँड अलाइड प्रॉडक्ट्स एक्स्पोर्ट प्रमोशन कौंसिलचे अध्यक्ष सुकुमार दास यांनी दिली. या कौंसिलने नुकतीच एक व्यापक पहाणी करून भारतीय पुस्तकांच्या व नियतकालिकांच्या निर्यातीतील गेल्या काही वर्षातील तुलनात्मक आकडेवारी प्रसिद्ध केली आहे.

बांगलादेशातील निलखेत या भागात भारतीय पुस्तके चोरून छापण्याचा व्यवसाय भरभराटीला आला आहे. बालसाहित्यापासून बेस्टसेलर कथाकादंबऱ्या आणि शाळा कॉलेजची पुस्तके सर्व प्रकारच्या साहित्याच्या चोरट्या आवृत्त्या येथे सर्रास छापलया जातात आणि त्या भारतात व अन्यत्र पाठवल्या जातात.

बांगलादेशाप्रमाणेच पाकिस्तानही या चोरट्या व्यवसायात पिछाडीला नाही. भरपूर खपाच्या बेस्टसेलर पुस्तकांच्या अनाधिकृत आवृत्त्या काढण्यावर पाकिस्तानचा भर आहे. भारत-पाक तणावामुळे भारतात अशा चोरट्या पुस्तकांची आयात तूर्त कमी झाली आहे. परंतु पाकिस्तानमधल्या अंतर्गत ग्रंथव्यवहारात अशा चोरट्या आवृत्त्यांचा सुळसुळाट आहे.

१९९१-९२ मध्ये भारतातून ४८ कोटी रुपयांची पुस्तके निर्यात झाली होती. २००१-०२ मध्ये ही निर्यात ३२३ कोटींच्या घरात गेली. १९९७-९८ या वर्षाचा अपवाद वगळता दरवर्षी निर्यातीत वाढ होत आहे. २००१-०२ मध्ये या वाढीला खीळ बसली; आणि निर्यातीत ८ टक्के घट झाली. त्यामुळे निर्यातवाढ कौंसिलने व्यापक सर्वेक्षण करून, ग्रंथव्यवहारातील चोरट्या व्यापाराचा मागोवा घेतला.

## २४ वर्षांत ४९५ पुस्तकांचे वाचन - दोन तपांचे वाचनवीर

पुस्तकांशी नातं जोडण्याच्या कैक तऱ्हा आहेत. नव्या कोऱ्या पुस्तकांच्या शुभ्र वासांपासून, जीर्ण पानांच्या पिवळ्या पडलेल्या आठवणीत अनेक जण गुंतून पडलेले असतात. पण जे जे उत्तम, आवश्यक नि कोणी चांगले म्हणून सुचवलेले असे वाचायलाच हवे, या दृढ संकल्पाने अनेक वर्षे एकत्र



येण्याची शिस्त पाळणे म्हणजे थोरच गोष्ट म्हणावी लागेल. पुस्तकांच्या या विराट ज्ञानडोहातले कण जवळजवळ रोज, नियमाने वेचत गेली २४ वर्षे हा 'कण कण' वेचण्याचा यज्ञ चालवणाऱ्या मुलुंडमधल्या काही विलक्षण वृद्धांची 'गँग' म्हणजे रसिकतेच्या गावातला चालताबोलता चमत्कार आहे.

'वाचन मंडळ' असं त्याचं सुटसुटीत नाव आहे. म्हणजे काहीतरी म्हणायला हवं म्हणून एरवी अध्यक्ष नाही वा कार्यवाह नाही, सभासद फी नाही वा वर्गणी नाही, घटना नाही की कोणी प्रमुख नाही. अशा मुक्त वातावरणात, या मंडळाचा वाचन व्यवहार चालू आहे.

गेल्या २४ वर्षात या मंडळाने ४९५ पुस्तकांचे वाचन केले आहे. ग्रंथाशी नातं सांगणाऱ्या कवी, लेखकांना, व्यासंगी म्हणवणाऱ्या समीक्षकांना नि मराठी वाचवण्याच्या घोषणा करणाऱ्या प्राध्यापकांनाही असा ग्रंथवसा घेणं कठीण आहे आणि त्याहून दुरापास्त आहे. या वाचनाचा असा सामूहिक आनंद घेत ५१ कादंबऱ्या, ३४ प्रवास वर्णने, १०९ आत्मचरित्रे, १३ लघुकथांची पुस्तके, १७ शास्त्रीय, ३६ आध्यात्मिक नि २०० संकीर्ण अशी जवळजवळ एक लाखाहून अधिक छापील पानांची शब्दसंपदा, यांच्या कानांनी लुटलीय आणि सारे त्याचे साक्षी आहेत.

'अहो, किती पुस्तकं आहेत हो घरी; पण वेळच मिळत नाही वाचायला ! अशी आधुनिक व्यस्तता, सध्या माणसांना पुस्तकांपासून दूर नेणाऱ्या नव्या संगणकीय दुनियेत, शिखरावरती आहे. अशा व्यस्ततेमुळेच पुस्तकांची शोकेसमध्ये प्रतिष्ठापना होते. त्यात इंग्रजी/हिंदी भाषेच्या राजमान्य झंझावतात, मराठीपणाचा वारा फारच क्षीणपणे अंग चोरून वाहतोय हे जाणवते.

या पार्श्वभूमीवर, २४ वर्षे सतत (रविवार वा सणांच्या सुट्या सोडून) जवळजवळ रोज पुस्तकाच्या एखाद्या पानावर आदल्या दिवसाची ओळख घेऊन जावे नि तिथून त्या पानापासून पुन्हा नव्याने, पुस्तकातल्या विश्वात छान मिसळून जावे, असे स्वप्नवत वाटणारे पुस्तकसुख हे मंडळ अविरत घेते आहे. अप्पा ताम्हणे हे या मंडळाचे प्रेरणास्थान. ते स्वत: चांगले वाचक आणि उमदे लेखकही. १९७८ साली अण्णांनीच मुंलडच्या जी. व्ही. स्कीम रस्त्यावरील 'प्राची' इमारतीत, पहिल्या माळ्यावर, आपल्या राहत्या घरातल्या छोट्या हॉलमध्ये, मित्रांच्या सहवासात पुस्तके वाचायला सुरुवात केली. तीच या वाचन मंडळाची सुरुवात. स्थलांतरित झालेले ९ आणि दिवंगत १६ अशा सभासदांसह एकूण सभासदांची संख्या आहे फक्त ४७. आता या घडीला सीनियर असलेल्या दत्ताजी ताम्हणे यांचं वय आहे ९०, तर सर्वांत ज्युनियर अशा भुसारींचं वय आहे ६२.

रोज हे सारेजण ९.३० वाजता जमतात. ठरलेले पुस्तक वाचतात, इतर घडामोडींवर चर्चा करतात. सकाळची अम्लान वेळ त्यांनी वाचनासाठी निवडलीय.

मंडळाचा वर्धापन दिन साजरा होतो; पण स्थानिक लेखकांना बोलावून साधेपणाच जपला जातो.

या मंडळाचा अर्थव्यवहार हीसुद्धा अशीच लक्षणीय गोष्ट. इतर साहित्य संस्थांपेक्षा यांचा अर्थव्यवहार फारच विपरीत. कारण या वाचन मंडळाची जमा शून्य नि खर्चही शून्य. वर्गणी नाही, देणगी नाही, त्यामुळे हिशेबाची कटकट नाही.

कोणालाही हेवा वाटावा अशा दोन तपांच्या या छोट्याशा वाचन मंडळाने पंचविशीत प्रवेश केला. अशी मंडळे गावागावातून निर्माण झाली, तर अडगळीत गेलेली कैक मराठी पुस्तके, खऱ्या अर्थाने पुन्हा जिवंत होतील. माणसात येतील !

प्रति,

# वाचकांचा प्रतिसाद

दीपावली अंक आकर्षक व परिपूर्ण

ग्रंथप्रसाराला वाहिलेल्या अन्य मासिकांपेक्षा आपल्या अंकाचे मुखपृष्ठ अधिक आकर्षक आणि मोहक आहे. १४४ पृष्ठांच्या भरगच्च अंकातील विविध विषयांवरील लेख माहितीपूर्ण आणि नावीन्यपूर्ण आहेत. त्यामुळे अंक परिपूर्ण वाटला.

अ. वि. पारगावकर, प्रतिमा प्रकाशन पुणे

दिवाळी अंकातील डॉ. यादवांचा लेख आवडला. मुलाखती छान वाटल्या. विशेष म्हणजे बेस्टसेलर पुस्तकांच्या लेखकांचे शंकर सारडा यांनी करून दिलेले परिचय उद्‍बोधक वाटले. अंक वाचनीय व संग्राह्य असून खूप आनंद देणारा आहे.

डॉ. द. ता. भोसले, पंढरपूर

ग्रंथांबरोबर ग्रंथलेखकांचीही माहिती देण्याची आपली प्रथा स्पृहणीय वाटते. दीपावली अंकातील साहित्य वाचनीय आहे.

ना. बा. मराठे, पुणे ३८

मेहता ग्रंथजगतचे पाश्चात्त्य वाङ्मयातील उत्तमोत्तम कलाकृतींचे अनुवाद स्वकियांपुढे ठेवून आपल्या कर्तृत्वाच्या सीमा ओलांडल्या आहेत. आपला दीपावली अंक परिपूर्ण वाटला.

आर. व्ही. जोशी, अंबरनाथ

आपला दिवाळी अंक फार छान आहे. संपूर्ण वाचून काढला. माझ्या माहितीत कितीतरी भर पडली. 'ग्रंथजगत' वाचायला मिळाल्यामुळे विशेष समाधान वाटले

तारा पंडित

मेधा सिधये, सुमेध वडावाला, डॉ. साळवी, अंबरिश कुलकर्णी, सुवर्णा दिवेकर, हेमा काटे, डॉ. आनंद यादव, दत्तात्रेय गानू यांनीही फोनवरून अंक आवडल्याचे आवर्जून कळवले. त्याबद्दल त्यांना धन्यवाद



# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २००२
◆ वर्ष दुसरे
◆ अंक बारावा

## — अनुक्रमणिका —


| | |
|---|---|
| **संपादकीय** - | २ |
| **साहित्यवार्ता** | ५ |
| **श्रद्धांजली** | २० |
| **पुस्तक परिचय** | |
| चिंतामुक्त जीवन : आर. डी. मुनोत | २१ |
| द ब्रेडविनर : अनु. अपर्णा वेलणकर | २६ |
| पेलिकन ब्रीफ : अनु. रवींद्र गुर्जर | २९ |
| वाचनातून विज्ञान : डी. एस् . इटोकर | ३४ |
| **आयडियल कान्ताशेठ :** वामन देशपांडे | ३७ |
| **पुरस्कार** | ४० |
| **फुले आणि काटे** | ४६ |
| **नवी स्पर्धा** | ३३ |
| **वाचकांचा प्रतिसाद** | ४८ |



- संपादक : सुनील मेहता
- कार्यकारी संपादक : शंकर सारडा
- संपादन सहाय्य : सुनीता दांडेकर
- अंकाची किंमत १० रु.
- वार्षिक वर्गणी मनीऑर्डरने पाठवावी.
- प्रसिद्धी दरमहा १५ तारखेस

- मांडणी-अक्षरजुळणी : *मेहता पब्लिशिंग हाऊस*


- संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता, १२१६ सदाशिव पेठ,धनश्री अपार्टमेंटस्, पुणे-३०. फोन : ४४७६९२४ फॅक्स : ०२०-४४७५४६२
**Email - mehpubl@vsnl.com**

**वार्षिक वर्गणी ८० रु. तीन वर्षांची २००रु. पाच वर्षांची ३००रु.**
**३ व पाच वर्षासाठी वर्गणीदार झाल्यास पुस्तक भेट !**

*या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.*